मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १९३ ■ मंगळवार, २४ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार 'राजमाता जिजाऊ' एसटी बससेवेचे लोकार्पण – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई :** महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत राज्याच्या सार्वजनिक परिवहन व्यवस्थेत नव्या पर्वाची सुरुवात होत आहे. 'राजमाता जिजाऊ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अत्याधुनिक एसटी बससेवेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत २४ मार्च २०२६ रोजी विधिमंडळाच्या प्रांगणात होणार आहे.

या सोहळ्यास विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



एसटी ताफ्यात तीन हजार अत्याधुनिक स्मार्ट बसेसची भर

मंत्री सरनाईक म्हणाले की, 'राजमाता जिजाऊ' बससेवेच्या समावेशामुळे एसटीच्या ताफ्यात परंपरा आणि प्रगती यांचा सुंदर संगम साधला गेला आहे. लवकरच एसटी महामंडळाच्या ताफ्यात तब्बल तीन हजार 'राजमाता जिजाऊ' या नावाने नव्या स्मार्ट बसेस दाखल होणार असून, त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठे बळ मिळणार आहे.

या बसेसना 'राजमाता जिजाऊ' हे नाव देण्यामागे हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणास्थान असलेल्या जिजाऊसाहेबांना अभिवादन करण्याची भावना आहे.

स्वराज्याचे शिल्पकार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मागील संस्कारशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ होय. या मातृशक्तीचा गौरव या नावातून अधोरेखित करण्यात आला आहे. एसटी महामंडळाने यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'यशवंती' आणि 'हिरकणी' अशा ऐतिहासिक नावांनी बससेवेला वेगळी ओळख दिली आहे.

त्या गौरवशाली परंपरेत आता 'राजमाता जिजाऊ' या नावाची भर पडल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा सन्मान अधिक समृद्ध झाला आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

नव्या बसेसची ठळक वैशिष्ट्ये :

या बसेसमध्ये ३×२ आसन रचना असून एकूण ५६ आसन क्षमता आहे, जी सध्याच्या बसेसपेक्षा १६ आसनांनी अधिक आहे. त्यामुळे प्रवाशांना अधिक आरामदायी आणि सुलभ प्रवासाचा अनुभव मिळणार आहे.

अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या या बसमध्ये चार सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस यंत्रणा, पॅनिक बटन, पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीम तसेच इलेक्ट्रॉनिक मार्ग फलक यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि स्मार्ट होणार आहे.या बसेस प्रामुख्याने दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर शटल सेवेसाठी चालविण्यात येणार असून, त्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल आणि वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल.

या योजनेअंतर्गत पहिल्या ५० बसेस नागपूर येथे दाखल होणार असून, तेथून या नव्या सेवेला प्रारंभ करण्यात येणार आहे.'राजमाता जिजाऊ' बससेवा ही केवळ वाहतुकीची सुविधा नसून महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभिमान आणि आधुनिकतेचा आत्मविश्वास यांचा संगम आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम, सुरक्षित आणि प्रवासी-केंद्रित होईल, अशी अपेक्षा मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली.

---

## नगरसेविका डॉ. अस्मिता घरत यांच्या जनता दरबाराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** राज्यातील विविध भागांत नगरसेवक आणि लोक प्रतिनिधींकडून नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी 'जनता दरबार' किंवा 'जनसंपर्क अभियानाचे' आयोजन केले जात आहे. या उपक्रमांमधून स्थानिक प्रश्न, नागरी सुविधा आणि प्रशासकीय अडचणींवर तत्काळ उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जातो. याच अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग १७ मध्ये नगरसेविका डॉ. अस्मिता जगदीश घरत यांनी नुकताच 'जनता दरबार' आयोजित करून नागरिकांच्या समस्या थेट जाणून घेतल्या आहेत.



नगरसेविका अस्मिता जगदीश घरत यांनी रविवारी (दि.२२ मार्च) त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात घेतलेल्या पहिल्याच जनता दरबाराला चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी विविध खात्यांसंदर्भात असलेल्या १०० हून अधिक तक्रारदारांच्या तक्रारी स्वतः नगरसेविका अस्मिता घरत यांनी जाणून घेत, त्या सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करून सोडविण्यावर प्रामाणिक लक्ष देणार असल्याचे त्यांनी आश्वासित केले.

सकाळी ११ वा. सुरू झालेला जनता दरबार दुपारी ०२ वाजेपर्यंत सुरू होता. यात नागरी सेवा सुविधांवर विशेष लक्ष देण्यात आले. विशेष म्हणजे वसाहतीमध्ये होत असलेला दूषित पाणीपुरवठा, महापालिका कर शहरात गर्दीच्या व वर्दळी ठिकाणी हायमास्ट उभारणे, सेक्टर १३ ए टाईप वसाहतीमधील गटार दुरुस्ती, पदपथावरील अतिक्रमण, सेक्टर १२ १३, १४ व १७ सह नवीन पनवेल परिसरात परप्रांतीयांच्या वाढत्या अवैध हातगाड्या, रास्त धान्य विक्री दुकान सेक्टर १३ ए टाईप मध्ये सुरु करणे, नवीन पनवेल पिल्लेज कॅम्पस जवळील उद्यानातील रनवेवरील पेव्हरब्लॉकची दयनीय अवस्था, उद्यानातील शौचालयातील पाणी समस्या, खाऊ गल्लीतील हातगाड्यां वरील स्वच्छता, पंचशील नगरातील बौद्धविहार दुरुस्ती, नागरी वसाहती मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, महानगरपालिका वसाहतीत कीटकनाशक फवारणी, मालमत्ता कर, शालेय मैदाना वर खेळविले जात असलेले क्रिकेट व त्यापासून होणारे वायू प्रदूषण तसेच ई१ से.१४ परिसरातील रस्त्यांवर बसविलेले पेव्हरब्लॉक दुरुस्ती करणे, ड्रेनेज लाईनसाठी टाकलेली पाईपलाईन यामुळे रस्त्यांची झालेली दुरावस्था यासंदर्भात नागरिकांच्या सर्वाधिक तक्रारी होत्या.

यावेळी प्रत्येक तक्रारदाराबरोबर नगरसेविका अस्मिता घरत यांनी चर्चा करून प्रश्न जाणून घेतले. आलेल्या तक्रारदारांचे अर्ज संबधित विभागांचे प्रमुख यांच्याकडे पाठविण्यात येणार असून लवकरच योग्य ती कार्यवाही होईल, असे यावेळी उपस्थितांना आश्वासित करण्यात आले.

## धाडसाची पराकाष्ठा! विषारी नागाला पकडून सर्पमित्राने वाचवले जीव"

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** रिसोड (वाशीम)तालुक्यातील मौजे आसेगाव (पेन) येथे एक थरारक आणि धाडसी घटना घडली असून, सर्पमित्र दशरथ मुजुळकर यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता विषारी सापाला पकडून मोठा अनर्थ टाळला आहे. त्यांच्या या कार्यामुळे परिसरात त्यांचे कौतुक होत आहे.

दि.19 मार्च 2026 रोजी रात्री सुमारे 9:10 वाजताच्या सुमारास आसेगाव (पेन) येथील सिलिंदर परिहार यांच्या राहत्या घरी अचानक साप दिसल्याने घरातील सदस्य आणि परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. साप अत्यंत विषारी असल्याची शक्यता लक्षात घेता तातडीने सर्पमित्र दशरथ मुजुळकर यांच्याशी संपर्क साधण्यात आला.




संपर्क मिळताच मुजुळकर यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती अत्यंत धोकादायक असतानाही त्यांनी शांतता आणि कौशल्य दाखवत त्या विषारी इंडियन कोब्रा सापाला सुरक्षितपणे पकडले. त्यांच्या या धाडसी कृतीमुळे मोठा अनर्थ टळला आणि उपस्थित ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास टाकला.

साप पकडल्यानंतर त्याला कोणतीही इजा न करता नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. यामुळे केवळ नागरिकांचे प्राण वाचले नाहीत, तर वन्यजीवांचेही संरक्षण करण्यात आले. या प्रसंगी आसेगाव (पेन) येथील बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते आणि त्यांनी मुजुळकर यांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले.सर्पमित्र दशरथ मुजुळकर हे नेहमीच आपत्कालीन परिस्थितीत तत्परतेने मदतीला धावून येतात. त्यांनी यावेळी नागरिकांना आवाहन करत सांगितले की, अशा प्रसंगी घाबरून न जाता त्वरित सर्पमित्रांशी संपर्क साधावा. साप आढळल्यास 7499056791 या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.आजच्या काळात मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष वाढत असताना, सर्पमित्रांसारख्या व्यक्ती समाजासाठी खऱ्या अर्थाने जीवनदाते ठरत आहेत. दशरथ मुजुळकर यांचे हे धाडस केवळ एका घटनेपुरते मर्यादित नसून, समाजासाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

---

## औद्योगिक भेटीतून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा** :लाखनी - सावरी/मुरमाडी येथील धनंजय तिरपुडे खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) यांच्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी १९ मार्च २०२६ रोजी हिंगणा एमआयडीसी येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते . या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी 'प्रिसिजन टर्न कॉम्पोनंट्स प्रा. लि.' आणि 'ट्रान्स इलेक्ट्रो इंजिनिअर्स' या नामांकित उद्योगांना भेट देत प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेतला.




या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता, उद्योगांमध्ये वापरल्या जाणाऱ्या यंत्रसामग्रीचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे हा होता. प्रिसिजन टर्न कॉम्पोनंट्स येथे विद्यार्थ्यांनी अत्याधुनिक CNC व VMC मशीनचे कार्य, जॉब सेटिंग आणि सूक्ष्म मापन प्रक्रियेचे निरीक्षण केले. तर ट्रान्स इलेक्ट्रो इंजिनिअर्स येथे इलेक्ट्रिकल पॅनेल निर्मिती, वायरिंग आणि ट्रान्सफॉर्मर संबंधित तांत्रिक बाबी याबाबत कंपनीच्या तज्ज्ञांकडून सविस्तर माहिती देण्यात आली.या भेटीदरम्यान फिटर व इलेक्ट्रिशियन ट्रेडच्या प्रशिक्षणार्थ्यांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. उद्योगांमधील शिस्त, सुरक्षा नियम आणि उत्पादनक्षमता याविषयीही व्यवस्थापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यशस्वी उपक्रमासाठी संस्थेचे सचिव श्री. धनंजय तिरपुडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या या पुढाकाराचे पालक व नागरिकांकडून कौतुक होत आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित; 'निष्पाप' नाट्यप्रयोगला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** दानशूर व्यक्तिमत्व आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला मुंबई मराठी पत्रकार संघ प्रस्तुत 'निष्पाप' या नाटकाचा विशेष प्रयोग उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडला. पनवेल येथील आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे आयोजित या प्रयोगाला प्रमुख मान्यवर म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख व त्यांच्या सुविद्य पत्नी वैशाली देशमुख, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष व नाटकाचे निर्माते संदीप चव्हाण, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन तसेच नाट्यप्रेमी नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली. अमृत महोत्सव वर्षनिमित्त यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा मुंबई मराठी पत्रकार संघाच्यावतीने सत्कार करण्यात आला. चोवीस तास बातम्यांच्या जगात वावरणाऱ्या पत्रकारांच्या संवेदनशीलता आणि सर्जनशीलतेला रंगभूमीवर योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने मुंबई मराठी पत्रकार संघाने पहिल्यांदाच ६४ व्या राज्य नाट्य स्पर्धेत सहभाग नोंदवला आणि पदार्पणातच दोन पुरस्कार पटकावण्याचा मान मिळवला आहे. मुंबई मराठी पत्रकार संघ प्रस्तृत या नाटकाने पत्रकारांच्या संवेदनशीलतेचा आणि अंतर्मनातील संघर्षाचा प्रभावी आविष्कार रंगमंचावर साकारला. प्रेक्षकांनी नाटकाला टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण निर्मित या नाटकाचे लेखन प्रा. दिलीप परदेशी यांचे असून दिग्दर्शन गुरुदत्त लाड यांनी केले आहे. प्रमुख भूमिकेत ज्येष्ठ पत्रकार देवदास मटाले आणि स्वाती घोसाळकर यांनी प्रभावी अभिनय सादर केला. तसेच गुरुदत्त लाड, प्रशांत चिडे, रश्मी महांबरे, सिद्धेश शिगवण आणि सुरेश ठुकरुळ यांनीही आपल्या भूमिकांद्वारे नाटकाला समर्थ साथ दिली. हा नाट्यप्रयोग केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता पत्रकारितेच्या क्षेत्रातील भावविश्व प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणारा ठरला असून, उपस्थितांकडून त्याचे विशेष कौतुक करण्यात आले.



# महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

## २५ मार्चपासून रायगड जिल्हा कबड्डी संघ सराव शिबीर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** दिनांक २ एप्रिल ते ६ एप्रिल २०२६ या कालावधीत सिन्नर (जि. नाशिक) येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या पुरुष व महिला कबड्डी संघांचे सराव शिबीर आयोजित करण्यात आले आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने हे शिबीर दि. २५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत पनवेल येथे उत्साहात पार पडणार आहे. दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या विशेष कबड्डी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर शिबिराचे आयोजन भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील तसेच रायगड जिल्हा कबड्डी



असोसिएशनच्या कार्यवाह चित्रा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण मिळावे आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सक्षम तयारी व्हावी, हा या शिबिरामागील मुख्य उद्देश आहे. या शिबिरामध्ये पुरुष संघातील १४ खेळाडू व २ प्रशिक्षक तसेच महिला संघातील १४ खेळाडू व २ प्रशिक्षक अशा एकूण ३२ जणांचा सहभाग असणार आहे. सर्व खेळाडूंसाठी निवास, भोजन व इतर आवश्यक सुविधांची उत्तम व नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक खेळाडूस संपूर्ण स्पोर्ट्स किट्स श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे प्रदान करण्यात येणार आहेत.

खांदा कॉलनीतील सिकेटी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित या शिबिराचे उद्घाटन बुधवार दि. २५ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. या उद्घाटन समारंभाला क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी व कबड्डीप्रेमी उपस्थित राहणार आहेत. शिबिराची संपूर्ण तयारी शिबीर प्रमुख आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम तसेच छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. त्यांच्या अनुभवी मार्गदर्शनामुळे खेळाडूंना तांत्रिक, शारीरिक व मानसिक पातळीवर सक्षम बनविण्यात येणार आहे. या शिबिरातून तयार होणारा रायगड जिल्हा कबड्डी संघ आगामी राज्य स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला असून, या उपक्रमामुळे जिल्ह्यातील कबड्डी खेळाला निश्चितच चालना मिळणार आहे.

---

## भोंदू अशोक खरात प्रकरण! रुपाली चाकणकरांना पडले भारी...

**दैनिक युवक आधार**

**कर्जत तालुका/वैभव गायकवाड :** गेल्या अनेक दिवसांपासुन चर्चेत असलेले अशोक खरात प्रकरण हे रूपाली चाकणकरांना अतिशय जड जाताना दिसत आहे. २१ तारखेला रूपाली चाकणकरांनी महिला आयोग अध्यक्ष पदाचा राजीनामा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना सोपवला. परंतु, रूपाली चाकणकर यांच्या अडचणी कमी होताना दिसत नाही. त्यांच्याच पक्षातील रूपाली ठोंबरे यांनी चाकणकरांवर अतिशय गंभीर आरोप करत घरचा आहेर देत, त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष याच्या प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा घेण्याची जोरदार मागणी केली. सोबतच शिवसेना (उ बा ठा गटाच्या) नेत्या सुषमा अंधारे व इतर सर्व विरोधी पक्षातील नेते व कार्यकर्त्यांनी देखील त्यांचा सर्व पदांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी केली. सोशल मीडिया व इतर समाज माध्यमांमधून रुपाली चाकणकरांविषयी मोठ्या प्रमाणात जनतेची नाराजी दिसून आली.

या सर्व गोष्टींचा विचार करता रुपाली चाकणकरांचे प्रदेशाध्यक्ष पद सुद्धा गेल्यात जमा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने या बाबत बैठक घेतली असून निर्णय हा चाकणकरांच्या विरोधातच येईल यात शंका नाही. अशोक खरात पोलिसांच्या ताब्यात असून आणखी ३ महिलांनी त्याच्याविरोधात लैंगिक छळाची तक्रार दाखल केली आहे. पुढील तपासात आणखी कोणते रहस्य बाहेर येईल हे पाहणे तितकेच महत्वाचे ठरणार आहे. मात्र रुपाली चाकणकर यांचे राजकीय भविष्य आता अंधारात जाताना दिसतं आहे हे नक्की.

---

## गुन्हेगारांना पकडण्यात नंदनवनपोलीसांची मोठी कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका :** वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली गुप्त वातमीदाऱ्च्या मदतीने तपास पथकाचे प्रभारी पोलीस उप-निरीक्षक प्रवीण पी. राऊत, पोहवा. प्रदीप काईटे, पोहवा. आशिष तितरमारे ब. नं. ५१८४, पोहवा. दिपक जुनहाकरे ब. नं. ५६६४, पोहवा. संजय वर्बाडे ब.नं.२११६, पोशि. प्रवीण गरापे, ब. नं. ६५१८, पोशी. राहुल खळकाट ब. नं. ६३७५, पोशी. सोमेश्वर भुल ब.नं. ६८०५, पोशी.प्रदीप भदाडे ब.नं.१४०२२ व पोशी. संजय मौक्कदम ब. नं. १७९८७. सर्व पो. ठाणे नंदनवन, नागपूर शहर यांनी गुन्हेगारांना पकडण्यात मोठी कामगिरी केली आहे.थोडक्यात माहिती असे की, दिनांक २१ वर्षीय नेव्ही देवेन्द्र रामटके यव २१ वर्ष वय. गल्ली नं.०४. मधील मेडियर जवळ, नंदनवन झोपडपट्टी, ठाणे नंदनवन, नागपूर शहर येथे त्याची मैत्रीण प्रिया उर्फ सपना मेश्राम सोबत मोबाईलवर बोलण असताना सपनाला आरोपी नाव संकेत गुलाबराव वंजारी २८ वर्ष वयाच्या फोन आला तेव्हा सपना आरोपी संकेतला




फिर्वाद्दी सोबत कॉन्फरन्स कॉल वर घेतले तेव्हा संकेत वंजारी फिर्यादिला अश्लील शिविगाळ करण्यास सुरुवात केली. नंतर संकेतने त्याचा फोन त्याच्या मित्राला नामे अशोक तनेलवार याला दिला. त्याने सुद्धा फिर्यादीला अश्लील शिविगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली त्यानंतर फिर्यादीचे हे मित्र राज मेंढे व अंशुल दाकोळे तिथे आले व फिर्यादीस लाथा भुक्क्याने मारहान करण्यास सुरुवात केले थोड्याच वेळात वैभव तमिलवार तिथे आला त्याने त्याचे खिशातून एक धारदार शस्त्र काढून आरोपी संकेत वंजारी यास दिले. आरोपी संकेत वंजारी याने त्याच हत्याराने फिर्वाद्दीचे गळ्यावर जिव घेण्याचे उद्देशाने केला तेव्हा त्यामळे डाव्या बाजुला जखम झाले

पोलीसांनी आरोपीला अटक करून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. आरोपीवर भारतीय न्याय सहिता २०२३ कलम ३०८(२), ३०८ (४), ३१५(२), ३१९(३), ३२६, ३४(४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वर नमूद गुन्ह्यात पो स्टेशन वाटोळा अप क्रमांक ६२०/२५,३०८(२),३०८(५),३५१(३) ,३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ चे गुन्ह्यामधील वरील तीनही आरोपी हे सराईत गुन्हेगार असून ते गुन्हा दाखल केलेल्या तारखेपासून फरार होते त्याचा तांत्रिक पद्धतीने तसेच गुप्त वातमीदाऱ्च्या मार्फत शोध घेत असताना माहिती प्राप्त झाली ही वरील गुन्हा तील सदर आरोपी हे वाठोडा पो स्टेशन हद्दीत येणार आहे त्यावरून बाकी सह कर्मचाऱ्यांच्या मदतीने सापळा रचून तीनही आरोपींना ताब्यात घेऊन त्यांना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली सदरची कामगिरी ही मा .पोलीस उपआयुक्त रश्मीता राव, परि. क. ४, नागपूर शहर व मा. श्री. प्रदीप शिरस्कर, सहा पोलीस आयुक्त, सक्करदरा विभाग, नागपूर शहर यांचे निर्देशप्रामणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी पोलीस उप-निरीक्षक प्रवीण पी. राऊत, पोहावा. प्रदीप काईटे, पोहवा. आशिष तितरमारे ब. नं. ५१८४, पोहवा. दिपक जुगणहके ब. नं. ५६६४, पोहवा. संजय बरवाडे ब.नं.२११६, पोशि. प्रवीण मरापे, ब. नं. ६५१८, पोशी. राहुल खळतकर ब. नं. ६३७५, पोशी. सोमेश्वर घुगल ब.नं. ६८०५, पोशी.प्रदीप भदाडे ब.नं.१४०२२ व पोशी. संजय मौक्कदम ब. नं. १७९८७. सर्व पो. ठाणे नंदनवन, नागपूर शहर यांनी केली आहे.

---

## देवणी तालुक्यात पीक कर्ज नियमित ठेवण्याचे आवाहन; कर्जमाफी, अनुदान व मतदान हक्कांसाठी निर्णायक संधी

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी/ पांडुरंग कदम :** देवणी तालुक्यातील कमालवाडी-डोंगरवाडी संयुक्त सेवा सहकारी सोसायटीसह विविध सहकारी संस्थांनी पीक कर्जदार शेतकरी सभासदांना येत्या ३१ मार्च २०२६ पर्यंत आपले पीक कर्ज नियमित (चालू) ठेवण्याचे तातडीचे आवाहन केले आहे. सध्या सुमारे ६० टक्के शेतकऱ्यांनी कर्ज नियमित केले असून उर्वरित ४० टक्के शेतकरी अद्याप बाकी असल्याची माहिती सोसायटीकडून देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या पीक कर्जावर दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी लागू करण्यात आली




आहे. त्याचबरोबर नियमित कर्जदार शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान मिळण्यासाठी पीक कर्ज खाते मार्च २०२६ पर्यंत चालू असणे अनिवार्य आहे.

पीक कर्ज थकीत राहिल्यास कर्जमाफीच्या निकषातून वगळले जाईल नियमित कर्जदारांना मिळणारा ६% व्याजदराचा लाभ गमवावा लागेल, बँक नियमानुसार मार्च 2025 पर्यंत चालू कर्ज केले असल्यास NPA थकित पात्र होण्यास तीन महिने लागते. तेव्हा कर्जमाफी पात्र होतो. मार्च 2026 मध्ये थकीत ठेवल्यास कर्जमाफी मिळेल" ही भ्रामक समजूत पूर्णपणे चुकीची आहे.

याशिवाय, जून २०२७ मध्ये होणाऱ्या सहकारी सोसायटीच्या सार्वत्रिक निवडणुकीत शेतकरी चालू सभासद मतदानासाठी पात्र होण्यासाठी किमान सलग तीन वर्षे पीक कर्ज नियमित असणे आवश्यक असल्याचे सहकार कायद्यात स्पष्ट नमूद आहे. त्यामुळे कर्ज नियमित ठेवणे हे केवळ आर्थिक नव्हे तर संस्थात्मक हक्कांसाठीही महत्त्वाचे ठरत आहे.यासंदर्भात सोसायटीचे चेअरमन विजयकुमार लुले, व्हाईस चेअरमन शिवाजीराव तपसाळे व सचिव शिवनखेडे यांनी संयुक्तपणे आवाहन करताना सांगितले की,

"शेतकरी सभासदांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता वेळेत पीक कर्ज चालू ठेवावे. शासनाच्या नवीन धोरणानुसार आणि सहकार कायद्याच्या तरतुदीनुसार पीक कर्ज नियमित ठेवणे हे शेतकऱ्यांसाठी आर्थिक सुरक्षितता आणि हक्कांचे संरक्षण यासाठी अत्यावश्यक ठरत आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनी विलंब न करता तात्काळ कर्ज मार्च २०२६ पर्यंत नियमित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

## श्री शिवाजी विद्यालय येथे चिमणी दिवस मोठा उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**रिसोड : प्रतिनिधी. रणजितसिह. ठाकुर :** श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रिसोड येथे दिनांक २० मार्च २०२६ रोजी 'चिमणी दिवस' मोठ्या उत्साहात व पर्यावरणपूरक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. राष्ट्रीय हरित सेनेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे प्रभावी मार्गदर्शन शाळेतील कलाशिक्षक विठ्ठल सरनाईक यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात चिमण्यांच्या संरक्षणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने करण्यात आली. सध्याच्या बदलत्या पर्यावरणीय परिस्थितीत चिमण्यांची संख्या झपाट्याने घटत असून त्यांच्या संवर्धनासाठी सर्वांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थ्यांना चिमण्यांसाठी सुरक्षित निवासस्थान व पाण्याची सोय उपलब्ध करून देण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.



या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पानवटे (पाण्याची भांडी) तयार करण्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. तसेच शाळेच्या परिसरात विविध ठिकाणी चिमण्यांसाठी पानवटे लावण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या कार्यात सहभाग घेतला. पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक संजयराव देशमुख होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सामाजिक वनीकरण विभागाच्या मनपाल निर्जला दिघोळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना चिमण्यांचे पर्यावरणातील स्थान आणि त्यांचे संरक्षण का आवश्यक आहे यावर सविस्तर प्रकाश टाकला. यावेळी वनरक्षक कु. ए. आर. मोटघरे मॅडम, पी. आर. जावळे व आर. एस. कदम यांचीही उपस्थिती लाभली. त्यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधत पर्यावरणपूरक सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले.

तसेच शाळेतील सहाय्यक शिक्षक डी. आर. पाचारने व महादेव बांगर यांनी चिमण्यांचे दैनंदिन जीवनातील महत्त्व, त्यांच्या अन्नसाखळीतील भूमिका व पर्यावरण संतुलन राखण्यात असलेले योगदान विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी आपल्या घराजवळ तसेच परिसरात चिमण्यांसाठी पानवटे लावण्याचा संकल्प केला. राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला पुढेही सातत्याने चालना देण्याचे आश्वासन दिले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता वाढून चिमण्यांच्या संवर्धनासाठी सकारात्मक विचार रुजले. शाळेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

---

## स्वच्छ भारत मिशन : मुदत संपूनही येवदा येथील ७८ लाखांच्या कामाला मुहूर्त निघाला

### कंत्राटदाराला अभय की यंत्रणेचा निष्काळजीपणा — प्रश्नचिन्ह कायम

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर**

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण कार्यक्रमांतर्गत दर्यापूर तालुक्यातील येवदा येथे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी रु. ७८,७२,९३०/- चे काम मंजूर करण्यात आले होते. करारनामा क्र. ब-१/९६२ दिनांक १०/०६/२०२५ नुसार श्री. चंद्रकांत शिवराम पाटील यांना हे कंत्राट देण्यात आले असून कामाची विहित मुदत १८० दिवस — म्हणजेच दिनांक ०६ डिसेंबर २०२५ पर्यंत निश्चित करण्यात आली होती. मात्र मुदत संपून तब्बल तीन महिने उलटले तरी हे काम सुरू झाले नाही. एवढेच नव्हे, तर जिल्ह्यातील एकूण ४३ कामांपैकी १४ कामे तर अद्याप



सुरूच झालेली नाहीत, तर सुरू झालेल्या कामांचीही प्रगती अत्यंत सुमार दर्जाची असल्याचे उघड झाले आहे.

काम सुरू होण्यापूर्वी बांधकाम साहित्याच्या चाचण्या घेणे बंधनकारक होते — त्या झाल्या का?

काम सुरू असताना व पूर्ण झाल्यावर जिओ टॅग फोटो सादर करणे अनिवार्य होते — ते सादर झाले का?

विहित मुदतीत काम न झाल्यास मुदतवाढीसाठी किमान १५ दिवस अगोदर प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते — तो प्रस्ताव आला का? या सर्व प्रश्नांची उत्तरे संबंधित यंत्रणेकडून मिळणे अपेक्षित असताना जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने कंत्राटदाराविरोधात कोणतीही ठोस कारवाई केल्याचे दिसून येत नाही.

विशेष म्हणजे या कामांसाठी स्वच्छ भारत मिशन (टप्पा-२), मनरेगा आणि १५ वा वित्त आयोग अशा तीन योजनांचा निधी एकत्रितपणे वापरण्याचे नियोजन होते. एवढ्या मोठ्या निधीचा विनियोग होऊनही कामे रखडलेली असणे हे केवळ प्रशासकीय निष्काळजीपणाच नव्हे, तर शासकीय निधीचा अपव्यय असल्याचे स्पष्ट होते.

**दोष दाखल कालावधीचाही प्रश्न**

करारनाम्यानुसार काम पूर्ण झाल्यानंतर २ वर्षांचा दोष दाखल कालावधी निश्चित करण्यात आला आहे. मात्र काम पूर्णच न झाल्यास हा कालावधी सुरू होणार कधी, आणि गुणवत्तेची जबाबदारी कोण घेणार — हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

ग्रामीण जनतेच्या कराच्या पैशातून उभारल्या जाणाऱ्या या कामांबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी समिती स्थापन करावी, रखडलेल्या कामांचा आढावा घ्यावा आणि दोषी कंत्राटदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

---

## येवदा येथे दि.१ मार्चला हिंदू संमेलनाचे आयोजन येऊ

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे:तालुका प्रतिनिधी दर्यापूर**

दर्यापूर तालुक्यातील येवदा विशाल हिंदू संमेलनाचे दिनांक १.३.२०२६ आयोजन केले आहे कार्यक्रमाचे रूपरेषा दुपारी ४.वा. बाईक रॅली भवानी माता मंदिर शास्त्रीनगर येथून सुरुवात होणार आहे. बाईक रॅली ची समाप्ती श्री संत गजानन महाराज संस्थान ऋषीवाडी येथे होणार . त्यानंतर दुपारी ५. वा.पासून गौ पुजा करून कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. अतिथी सत्कार सामायिक हनुमान चालीसा पठाण व संत आशिवर्चन संबोधन श्रीमंत शिवानंद पुरी महाराज(सचिव श्रीपंच जुना आखाडा त्र्यंबकेश्वर)

मातृशक्ती संबोधन - वर्षाताई उफाळे(सह संयोजिका विश्व मांगल सभा प्रांत) प्रमुख अतिथी: प्राचार्य सौ विद्याताई मुरेकर(आय.ए एस. गर्ल्स हायस्कूल अँड ज्युनिअर




कॉलेज परतवाडा). श्री. हितेशजी शृंगारे. (नगर बौद्धिक प्रमुख नेर परसोपंत.)व.ऑड. अजिंक्यजी धर्माधिकारी (दर्यापूर) प्रमुख वक्ते: ईशानजी गिद(संयोजक भारतीय विचार मंच अमरावती महानगर) कार्यक्रम समारोप धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज बलिदान मास श्लोक व ध्येय मंत्र घेऊन कार्यक्रमाची सांगता होईल. श्री संत गजानन महाराज ऋषी वाडी येवदा येथील विशाल हिंदू संमेलनाचे आयोजन केले आहे. तरीसुद्धा दर्यापूर तालुक्यातील सर्व गावकरी मंडळींना उपस्थित राहण्याचेआवाहन केले आहे. सखल हिंदू समाज मंडळ येवदा दर्यापूर

# सणसरमध्ये भव्य रक्तदान शिबिर – रक्तदात्यांसाठी खास भेट

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : रामनवमीच्या पावन पर्वावर सणसर पंचक्रोशीतील नागरिकांसाठी जय श्रीराम प्रतिष्ठाण सणसर यांच्या पुढाकाराने,प्राथमिक आरोग्य केंद्र सणसर व शिवनंदन हॉस्पीटल ब्लड स्टोअरेज सेंटर,बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन बुधवार २५ मार्च २०२६ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र,सणसर येथे करण्यात आले आहे.

या शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास २० लिटर पाण्याचा जार मोफत भेट दिला जाणार आहे. मात्र खरी भेट ही आहे तुमच्या रक्तातून उमलणारे जीवन! समाजहितासाठी रक्तदान करून जीवनदान देण्याची ही संधी नागरिकांनी गमावू नये, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सणसर व पंचक्रोशीतील नागरिकांनी या उपक्रमात उत्साहाने सहभागी होऊन रक्तदान करावे,असे आव्हान जय श्रीराम प्रतिष्ठाण यांच्या वतीने करण्यात आले आहे. या सामाजिक उपक्रमाबद्दल प्रतिष्ठाणचे सर्वत्र कौतुक होत असून,समाजहिता साठी दिलेला हा पुढाकार खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरत आहे.

# मनोरुग्ण् बंद्यासाठी योगा व ध्यान शिबीर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी**

**नागपूर** : श्री वैभव सु.आगे कारागृह अधीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक पुर्व विभाग नागपूर,यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृहातील मनोरुग्ण् बंद्यासाठी योगा व ध्यान शिबीरला दि 20.03.2026 रोजी सुरूवात झाली. योगप्रशिक्षक श्रीमती सीमा क्षीरसागर ,प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर सदरील शिबीर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत करण्यात आले आहे.मानसिक आरोग्यासाठी



योगा व ध्यान शिबीर मोठया प्रमाणावर नागपूर मध्यवर्ती कारागृहात राबवली जात असतात. बंद्यामधील नैराश्य् दुर करणे आणि त्यांच्यामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणे . अश्या शिबीरामध्ये बंद्याच्या वर्तनात बदल घडवून आणण्यासाठी आणि कारागृहात तणावमुक्त् वातावरण राखण्यासाठी अंत्यत प्रभावी ठरत आहेत.

# चारित्र्यनिर्मिती हाच भक्कम नेतृत्वाचा पाया - उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन

## विकसित भारत घडविण्यात सामाजिक आणि सांस्कृतिक योगदानही महत्त्वाचे – राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव** : भारतीय युवा संसद परिषद हे केवळ चर्चेचे व्यासपीठ नसून ते भविष्यातील जबाबदार नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. या परिषदेच्या माध्यमातून तुमच्या विचारांना आकार दिला जातो. चारित्र्याची जडणघडण होते. चारित्र्यनिर्मिती हाच भक्कम नेतृत्वाचा पाया आहे. जर आपले आयुष्य चारित्र्य संपन्न असेल, तर आपले नेतृत्व प्रभावी ठरेल, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

रेशीमबाग येथील महर्षी व्यास सभागृहात 29 व्या भारतीय युवा संसद परिषदेचे उपराष्ट्रपती सी . पी. राधाकृष्णन आणि महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह सरकार्यवाह डॉ. कृष्ण गोपाल, केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी, भारतीय युवा संसद परिषदेचे राष्ट्रीय संयोजक आशुतोष जोशी व्यासपीठावर उपस्थित होते.



उपराष्ट्रपती पुढे म्हणाले की, कोणत्याही देशाची क्षमता आणि सामर्थ्य हे त्या देशाच्या तरुण लोकसंख्येच्या आकारावर आणि ताकदीवर अवलंबून असते. भारताकडे तरुणांची मोठी संख्या ही जमेची बाजू आहे. आज देशातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांखालील आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली केंद्र सरकारने तरुणांच्या शिक्षण, कौशल्य आणि नेतृत्व विकासासाठी अनेक उपक्रम सुरू केले असल्याचे ते यावेळी म्हणाले.

भारतीय युवा संसद नॅशनल ट्रस्टच्या गेल्या दोन दशकांपासून सुरू असलेल्या अविरत सेवेचे त्यांनी यावेळी कौतुक केले. भारतीय युवा संसदेच्या देशाच्या कानाकोपऱ्यात परिषदा आयोजित करण्यात आल्या आहेत. देशातील तरुणांना जोडणारा एक महत्वाचा दुवा म्हणून त्यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे ते यावेळी म्हणाले.

देशाच्या अमृत काळात आपण सर्वजण मिळून २०४७ पर्यंत विकसित भारताचे उद्दिष्ट गाठण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवले आहे. यशाचा हा आलेख गाठण्यात युवकांची भूमिका महत्त्वाची असणार आहे. अधिक मजबूत, सर्वसमावेशक आणि समृद्ध भारत घडवण्यासाठी भक्कम चारित्र्य आणि नेतृत्वाच्या बळावर सक्रिय सहभागी होण्याची संधी युवकांना असून त्यांनी या संधीचे सोने करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**विकसित भारत घडविण्यात सामाजिक आणि सांस्कृतिक योगदानही महत्त्वाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा**

भारताची युवा पिढी ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. ही उत्साही व गतिमान पिढी राष्ट्र निर्माणात मोलाची ठरणार आहे. २०४७ या वर्षापर्यंत विकसित भारत घडविण्यासाठी केवळ आर्थिक योगदानापुरते मर्यादित राहता येणार नाही. यासोबतच सामाजिक आणि सांस्कृतिकही योगदान महत्त्वाचे ठरणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी आज येथे केले.

विविधतेत एकता हे आपल्या देशाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. भाषा, धर्म, जात, पंथ देशातील विविध भागात वेगवेगळया असल्या तरी देश एकसंघ असल्याचे दिसून येतो. आजवर देशावर अनेक आक्रमणे झाली आहेत. मात्र आपल्या एकसंघतेच्या बळावर ही आक्रमणे परतवून लावल्याचे ते म्हणाले.

भारतीय युवा संसद परिषदेला सहाव्यांदा उपस्थित राहात असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. अत्यंत नियोजनबद्ध आणि शिस्तीत ही परिषद आयोजित करण्यात येत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. देशातील सर्वच भागातील युवा नेते आणि तरुण या परिषदेला येऊन राष्ट्रनिर्मितीची चर्चा करीत असतात. आजच्या 'स्क्रीन टाईम'च्या काळात ही फलदायी चर्चा महत्वाची ठरत असल्याचे ते यावेळी म्हणाले.

# निफाडमध्ये खळबळजनक खून प्रकरण उघड; अनैतिक संबंधातून रचलेला कट, आरोपी अटकेत

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : नाशिक जिल्ह्यातील निफाड शहरात मानवी नात्यांना काळिमा फासणारी आणि परिसराला हादरवून सोडणारी अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अनैतिक संबंधांच्या गुंत्यातून एका महिलेचा खून करून मृतदेहाची अमानुष पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून, या प्रकरणी निफाड पोलिसांनी मुख्य आरोपी अरुण ढेपले याला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मामलेदार चौक परिसरातील रहिवासी रंभाबाई काळे या २४ फेब्रुवारीपासून अचानक बेपत्ता झाल्या होत्या. त्यांचा काहीच मागमूस लागत नसल्याने चिंताग्रस्त नातेवाईकांनी निफाड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. सुरुवातीला हे प्रकरण बेपत्ता म्हणून नोंदवण्यात आले होते; मात्र कालांतराने परिस्थिती संशयास्पद वाटू लागल्याने पोलिसांनी तपास अधिक सखोल करण्याचा निर्णय घेतला.ग्रामीण पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर आणि विभागीय पोलीस अधिकारी कांतीलाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस



निरीक्षक गणेश गुरव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनल फडोळ आणि पीएसआय विजय गायकवाड यांच्या पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली. तांत्रिक पुरावे, मोबाईल कॉल डिटेल्स, स्थानिकांकडून मिळालेली माहिती तसेच संशयितांच्या हालचालींचे बारकाईने विश्लेषण करण्यात आले.

तपासादरम्यान अरुण ढेपले याच्यावर संशयाची सुई स्थिरावली. सुरुवातीला त्याने “माझा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही” असा बनाव करून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी सातत्याने चौकशी करत त्याच्या हालचाली, वक्तव्यांतील विसंगती आणि उपलब्ध पुरावे यांची सांगड घातली. मानसिक दबाव आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे घेतलेल्या चौकशीत आरोपी अखेर कोलमडला आणि त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनैतिक संबंधांमुळे निर्माण झालेल्या वादातून आरोपीने रंभाबाई काळे यांचा गळा आवळून खून केला. त्यानंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह पोत्यात कोंबून त्यात दगड भरले आणि देवपूर रोडलगतच्या एका पडक्या विहिरीत फेकून दिला. ही माहिती समोर आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पुढील तपासाची कारवाई केली.

याचबरोबर, गुन्हा झाकण्यासाठी आरोपीने स्वतः विष प्राशन केल्याचा बनाव करून पोलिसांची दिशाभूल करण्याचाही प्रयत्न केला होता. मात्र पोलिसांनी त्याचा हा डाव ओळखून त्याला ताब्यात घेतले आणि चौकशीतून संपूर्ण कट उघडकीस आणला. या प्रकरणाच्या तपासात पोलीस कर्मचारी नितीन सांगळे, मनीषा गायकवाड, संगीता जाधव, धनंजय जाधव, अरविंद ढवळे, धनंजय बैरागी, विनोद जाधव, राजेंद्र दरोडे, सागर सानप आणि सुधाकर चव्हाणके यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या सततच्या प्रयत्नांमुळे आणि अचूक तपासामुळे प्रकरणाला निर्णायक वळण मिळाले.

या घटनेमुळे निफाड शहरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये चर्चांना उधाण आले आहे. पोलिसांनी वेळीच तपासाची दिशा ओळखत आरोपीला अटक केल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

दरम्यान, आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**निफाड पोलिसांची धडाडी पुन्हा एकदा सिद्ध!**

थंड डोक्याने रचलेला हा क्रूर कट उधळून लावत आरोपीला कायद्याच्या कचाट्यात ओढण्यात पोलिसांना यश आलं… निफाड हादरलं, पण पोलिसांच्या कडक कारवाईने गुन्हेगारांचा थरकाप उडाला!

# रानवडमध्ये पवार कुटुंबावर काळाचा घाला

## दोन चिमुकल्यांचे मृतदेह कालव्यात, एक मुलगा बेपत्ता

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी /राहुल कुलकर्णी** : निफाड तालुक्यातील रानवड येथे अत्यंत धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना रविवारी उघडकीस आली असून पवार कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. घरातील किरकोळ वादानंतर वडिलांनी आपल्या तीन मुलांना केस कापण्यासाठी घेऊन जात असल्याचे सांगत घराबाहेर पडले; मात्र काही तासांतच या घटनेने भीषण वळण घेतले.

दीपक पोपट पवार (वय 28) यांनी आपल्या तीन मुलांसह घर सोडले होते. त्यानंतर निफाड हद्दीतील पालखेड डाव्या कालव्यात दोन लहान मुलांचे मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला.

सोशल मीडियाच्या मदतीने आणि स्थानिक चौकशीतून मृत मुलांची ओळख पटविण्यात आली. प्रसाद दीपक पवार (वय 3 वर्षे) आणि वीर दीपक पवार (वय 5 वर्षे) अशी मृत मुलांची नावे असून ते रानवड येथील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले.यानंतर दीपक पवार आणि त्यांचा तिसरा मुलगा अविनाश यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी आणि स्थानिक प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम हाती घेतली. दरम्यान,




वडिलांचा मृतदेह सापडला असल्याची माहिती समोर आली असली तरी मुलगा अविनाश अद्यापही बेपत्ता असून शोधकार्य सुरू आहे.

दीपक पवार, त्यांची पत्नी पूजा आणि भाऊ राहुल हे गेल्या सात वर्षांपासून शिवप्रसाद वाघा वाईन्स येथे काम करत होते. त्यामुळे या कुटुंबावर ओढवलेले हे संकट अधिकच वेदनादायी ठरले असून संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड पोलिसांकडून सुरू असून कपालेश्वर ढिकले, पोलीस सागर जाधव आणि योगेश खर्जे हे तपासात सहभागी आहेत.घटनेमुळे रानवडसह परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून बेपत्ता मुलाच्या शोधाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अपरिचिताचा शेवटचा प्रवास.... एक चांगली सुरुवात

मी श्रीकांत एक टॅक्सी चालक आहे. बहुतेक वेळा मी रात्रीची पाळी करतो. गेल्या आठवड्यात रात्री साधारण अकरा वाजता एक वयस्कर गृहस्थ माझ्या टॅक्सीत बसले. सफेद कुर्ता, धोतर, थकलेले डोळे—पण त्यांच्या आवाजात एक वेगळाच ठामपणा होता.

टॅक्सीत बसताच ते म्हणाले,आज रात्री तू मला पाच ठिकाणी घेऊन जायचे आहे. मी तुला ₹ ५००० रोख देईन. पण प्रवास संपेपर्यंत ' का ' असा एकही प्रश्न विचारायचा नाही.

त्यांनी माझ्या हातात एक चिठ्ठी दिली, त्यावर पाच पत्ते लिहिले होते.

पहिला थांबा

नाशिक मधील एक जुने घर. मी गाडी थांबवली. ते खाली उतरले नाहीत. फक्त काच खाली करून त्या घराकडे शांतपणे पाहत राहिले. दहा मिनिटे गेली. त्यांच्या डोळयांतून अश्रू वाहत होते, पण आवाज नव्हता.

चला… पुढच्या ठिकाणी जाऊया, ते हळूच म्हणाले.

दुसरा थांबा

एक प्राथमिक शाळा, गेट बंद होते. आत अंधारात खेळाचे मैदान दिसत होते. ते गाडीतून उतरले आणि हळूहळू झोपाळयाजवळ गेले. त्यावर बसून हलके हलके झोके घेऊ लागले. वीस मिनिटांनी ते परत आले.

ते म्हणाले, “ इथे मी ४३ वर्षे शिक्षक म्हणून काम केले. माझ्या आयुष्यातील सर्वात सुंदर काळ इथेच गेला.”

तिसरा थांबा

एक छोटंसं जुने कॉफी हाऊस ते आत गेले आणि चहाचा एक कप मागवला. एका कोपऱ्यात बसले, पण चहाला हातही लावला नाही. फक्त आजूबाजूला पाहत बसले. पंधरा मिनिटांनी हलकंसं हसत बाहेर आले.

ते म्हणाले, “इथेच मी पहिल्यांदा नयना ला भेटलो होतो… १९६९ साली.”

चौथा थांबा

कैलाश स्मशानभूमी. ते खाली उतरले. एका स्मृतीफलकासमोर उभे राहून काहीतरी पुटपुटत होते—जणू प्रार्थना करत होते. अर्ध्या तासाने परत आले तेव्हा त्यांचे डोळे लाल झाले होते.

ते म्हणाले, “ती गेल्याला आता तीन वर्षे झाली.”

पाचवा थांबा

एक मोठे सरकारी रुग्णालय. त्यांनी गाडी थांबवायला सांगितले. मग माझ्याकडे पाहून म्हणाले,

“आता मी तुला कारण सांगतो. मला चौथ्या टप्प्यातील कर्करोग आहे. डॉक्टर म्हणतात—काही आठवडे… कदाचित काही दिवसच उरले आहेत. म्हणून आज रात्री माझे संपूर्ण आयुष्य शेवटच्या वेळेस पाहून घ्यायचे होते.”

हे ऐकून मी स्टेअरिंगवर डोके टेकवून रडू लागलो.

ते शांतपणे म्हणाले—

ते घर… जिथे मी माझी मुलं वाढवली.

ती शाळा… जिथे मला माझ्या आयुष्याचा उद्देश सापडला.

ते कॉफी हाऊस… जिथे मी प्रेमात पडलो.

ते स्मशान… जिथे मी माझ्या पत्नीला शेवटचा निरोप दिला.

आणि हे रुग्णालय… जिथे आज मी दाखल होणार आहे. मी पुन्हा घरी परतणार नाही.”

त्यांनी ₹ ५००० माझ्या हातात दिले.

धन्यवाद. तू मला माझे आयुष्य पुन्हा एकदा पाहायला मदत केलीस. माझ्या आयुष्यातील शेवटचा *अपरिचित* माणूस—पण खूप माणुसकीने वागणारा.

मी म्हणालो, “नको तात्या, हे पैसे मी घेऊ शकत नाही.

ते म्हणाले, घे. हे देण्यासाठी माझ्याकडे आता कोणी नाही. माझी मुलं माझ्याशी बोलत नाहीत. मित्रही उरले नाहीत. पण तू मला तीन तास दिलेस — तीन तास माणुसकीचे , त्याची किंमत पैशापेक्षा जास्त आहे.

त्यांनी आपली छोटी बॅग घेतली आणि रुग्णालयात आत गेले.

दुसऱ्या दिवशी मी पुष्पगुच्छ घेऊन त्यांना भेटायला गेलो. त्यांनी मला पाहून स्मित हास्य केलं

तू आलास ?

मी म्हणालो, ' तुम्हाला असंच सोडून येणं मनाला पटत नव्हतं.

आम्ही दोन तास बोललो— त्यांच्या पत्नी नयना बद्दल , त्यांच्या विद्यार्थ्यांबद्दल, आणि दूर गेलेल्या मुलांबद्दल.

मी रोज जाऊ लागलो. चहा घेऊन जायचो, त्यांना वर्तमानपत्र वाचून दाखवायचो. कधी कधी फक्त त्यांच्या शेजारी शांत बसायचो.

एकदा ते म्हणाले,

“मी एकटाच मरणार असं वाटत होतं. पण तू आता इथे आहेस. शेवटी एक *अपरिचितच* कुटुंबासारखा झाला— हेच माझं भाग्यच !

मी त्यांचा हात हातात घेत म्हणालो,

तुम्ही एकटे नाही आहात तात्या

दुसऱ्या दिवशी पहाटे ३:१७ वाजता त्यांचं निधन झालं. मी त्यांचा हात धरून तिथेच बसलो होतो.

त्यांचे शेवटचे शब्द होते—

“सगळ्यांना सांग… *अपरिचित लोकांकडे लक्ष* दे…. आपण सगळे कुठेतरी निघालो आहोत. काहीजण जलद, काहीजण हळूहळू. पण वाटेत माणुसकी दाखवत जा. तू तसं केलंस… आणि माझे शेवटचे दिवस सुंदर केलेस.

मॉनिटरचा आवाज थांबला… आणि सरळ रेषा दिसू लागली.

त्यांच्या अंत्यसंस्काराला फक्त सहा लोक होते—

मी, तीन परिचारिका, एक वकील आणि त्यांचा एक जुना विद्यार्थी.

४३ वर्षांचे अध्यापन.

५२ वर्षांचा संसार.

८१ वर्षांचे आयुष्य… आणि शेवटी फक्त सहा माणसं.

त्या दिवशी मला एक मोठा धडा मिळाला—

प्रत्येक अपरिचित माणूस कोणाच्या तरी आयुष्याचं संपूर्ण जग असतो.

प्रत्येक प्रवाशामागे एक कथा असते.

प्रत्येक माणूस जगत असतो… आणि कुणीतरी आपल्याला समजून घ्यावं, इतकीच त्याची अपेक्षा असते.

आजही ते ₹ ५००० रुपये मी खर्च केलेले नाहीत. ते माझ्या टॅक्सीतच ठेवले आहेत. कारण प्रत्येक प्रवासी कदाचित आपल्या आयुष्याच्या शेवटच्या प्रवासावर असू शकतो.

त्या एका शिक्षकाने मला शिकवले

माणुसकी ही काही अतिरिक्त गोष्ट नाही; तीच खरं आयुष्य आहे.

चला… आपणही असा प्रयत्न करूया.कदाचित आपल्याला भेटणारा एखादा अपरिचित माणूस आपल्या आयुष्याच्या शेवटच्या प्रवासात असेल.*आपण त्याच्या आयुष्यात थोडासा का होईना, प्रकाश आणि माणुसकी देऊया.

**संकलन : - श्री. सुरेश शिवाजी आव्हाड मा. मुख्याध्यापक , नाशिक.**

## नागपूरात जुगार अड्ड्यावर धाड; 17 जण अटकेत, 3 लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग** : नागपूर शहरातील अवैध धंद्यांवर कारवाईचा धडाका कायम ठेवत गुन्हे शाखा युनिट क्रमांक 5 ने नवीन कामठी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठी कारवाई केली. रनाळा गाव परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर टाकलेल्या धाडीत तब्बल 17 आरोपींना रंगेहात अटक करण्यात आली असून 3,02,530 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई दिनांक 22 मार्च 2026 रोजी दुपारी 3.30 ते 4.50 वाजण्याच्या दरम्यान करण्यात आली. गुन्हे शाखेचे सपोनी गणेश कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम 4 व 5 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हे शाखेचे पथक रनाळा रोड परिसरात पेट्रोलिंग करत असताना सदर ठिकाणी जुगार सुरू असल्याची खात्री पटली. त्यानंतर पथकाने तात्काळ छापा टाकत आरोपींना जुगार खेळताना रंगेहात पकडले. दोन पंचांच्या उपस्थितीत घटनास्थळी झडती घेऊन मुद्देमाल जप्त करण्यात आला.




जप्त मुद्देमालात 52 पत्त्यांचे ताश, 11,280 रुपये रोख रक्कम तसेच विविध कंपन्यांचे 16 मोबाईल फोन (किंमत अंदाजे 2,91,070 रुपये) असा एकूण 3,02,530 रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

या प्रकरणातील मुख्य आरोपी प्रफुल अंबादास राव (रनाळा, कोराडी बायपास) हा जुगारासाठी जागा उपलब्ध करून देणारा असून तो सध्या फरार आहे. त्याचा शोध पोलीस घेत आहेत.

या कारवाईमुळे परिसरातील अवैध जुगार व्यवसायाला मोठा धक्का बसला असून नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. पुढील तपास गुन्हे शाखा युनिट क्रमांक 5 कडून सुरू आहे.

# नियमित आरोग्य तपासणी कडे लक्ष देण्याची गरज - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## ४ हजार ६८७ रुग्णाची तपासणी ; ७५६ रुग्णांना मोफत चष्मे वाटप

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** आपले आरोग्य हेच खरे धन आहे. नागरिकांनी नियमित आरोग्य तपासणी, संतुलित आहार, स्वच्छता आणि व्यायाम याकडे लक्ष देण्याचे आवाहन नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यानो केले. श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, जिल्हा खनिज प्रतिष्ठान नागपूर , महाराष्ट्र शासन यांच्या सयुक्त विद्यमाने मौदा तालुक्यात खात येथे आयोजित करण्यात आलेल्या महा आरोग्य निःशुल्क शिबिराच्या उद्घाटनाच्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी आमदार टेकचंद सावरकर ,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष निशा सावरकर, व विविध मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एकूण ४६८७ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ७५६ रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.




पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पालकत्वाखाली तळागळातील सर्व घटकांना उत्कृष्ट आरोग्य सुविधा प्राप्त व्हाव्या या हेतूने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढत आहे. आपण आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असल्याचे आवाहन करत वेळेवर तपासणी आणि योग्य उपचार मिळाल्यास अनेक गंभीर आजारांवर नियंत्रण मिळवता येते, असे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नमूद केले.

गुटखा आणि मद्य सेवेन कण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे आरोग्यावर परिणाम होऊ लागले असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. यावेळी बावनकुळे म्हणाले, निवडणुकीवेळी जनतेला दिलेल्या आश्वासनांचा उल्लेख करत सर्व शासकीय सुविधा या जनतेच्या दारापर्यंत पोचविण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. ग्रामीण भागात अशी २० शिबिरे आयोजित करण्यात येणार आहे. पुढील शिबीर ११ एप्रिलला धानला येथे होणार असल्याचे यावेळी बावनकुळे यांनी जाहीर केले.

या आरोग्यशिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे रुग्नांच्या फक्त रोग निदान पर्यंत मर्यादित न राहता शिबिरानंतर सर्व गरजूंना विविध रुग्णालयांमध्ये मोफत उपचार मिळवून दिले जाणार आहेत.सर्व शासकीय योजना तसेच श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी मार्फत मदत निधीतून सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविण्याचे कार्य सुरु झाले आहे नोंदणी करणाऱ्या सर्व रुग्णांना रक्तदाब, रक्त शर्करा इतर पॅथॉलॉजी चाचण्या शिबिरातच मोफत करण्यात आल्या. सर्व प्रकारचे पूर्व कर्करोग तसेच कर्करोग तपासणी, महिलांकरिता विशेष स्तन आणि गर्भाशयाचे कर्करोग , मोफत दंत रोग तपासणी देखील करण्यात आली. २४ संशयित कर्करुग्ण रुग्ण या शिबिरात आढळून आले. दंत आणि मुखरोगाचे प्राथमिक उपचार हे अद्ययावत मोबाईल डेंटल व्हॅन मध्ये शिबिरस्थळीच करण्यात आले. रुग्णांना औषधींचे वाटप मोफत स्वरूपात शिबिरात करण्यात आले.

या शिबिराच्या आयोजनासाठी श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानचे प्रवीण लिखणकर, पालकमंत्री कार्यालयातर्फे डॉ. वैभव कारेमोरे, डॉ. सौरभ अग्रवाल, डॉ. योगेश सवाई महेश बोन्डे, रामेश्वर लिचडे , चान्गोजी तिजारे , भगवानजी बावनकुळे, श्रीकांत मुडे , कांचन देवघरे आदींनी सहकार्य केले.

## मोठे वाघोदे ता. रावेर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्षपूर्ती निमित्त भव्य हिंदू संमेलन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : मोठे वाघोदे (ता. रावेर) : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षपूर्ती निमित्त सकल हिंदू समाज चिनावल मंडळाच्या वतीने मोठे वाघोदे येथे भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ स्वयंसेवक विजयकुमार पाटील हे होते. तर प्रमुख उद्घाटक म्हणून विश्व हिंदू परिषदचे केंद्रीय संघटन महामंत्री व राष्ट्रीय प्रवक्ते श्री. मिलिंदजी परांडे हे उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महामंडलेश्वर पवनकुमारदासजी महाराज (खंडोबावाडी देवस्थान, फैजपूर) तसेच प. म. श्री. दिवाकर बाबा शास्त्री (श्रीकृष्ण मंदिर महानुभाव आश्रम,




वाघोदे) हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. विजयकुमार पाटील यांच्या हस्ते श्री. मिलिंदजी परांडे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच महामंडलेश्वर पवनकुमारदासजी महाराज यांचा सन्माम योगेश भंगाळे तर दिवाकर बाबा शास्त्री यांचा सन्मान केतन पाटील यथोचित गौरव करण्यात आला.या प्रसंगी भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे राज्य सचिव अँटी करुप्शन फाउंडेशन ऑफ इंडिया राज्य अध्यक्ष मानव अधिकार आंतरराष्ट्रीय फेडरेशन राज्य अध्यक्ष सर्व शक्ती सेना हिंदुत्ववादि संघटना राज्य अध्यक्ष प्रा. संजय मोरे तसेच भाजपा किसान मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष राहुल महाजन यांनी विश्वहिंदू परिषद केंद्रीय संघटन महामंत्री यांचा 'जय हिंद, वंदे मातरम्' लिहिलेला मफलर, पेन व 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीतून इस्लाम' हे पुस्तक सरनेह सप्रेम भेट दिले.

मनोगत व्यक्त करताना महामंडलेश्वर पवनकुमारदासजी महाराज यांनी हिंदू समाजातील जातीय भेदभाव, मतभेद व संघर्ष दूर होऊन समाज एकसंध व समरस व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. तर श्री. मिलिंदजी परांडे यांनी हिंदू संमेलनाच्या माध्यमातून समाजात एकात्मता, भारतीय संस्कृतीचे जतन व सामाजिक बांधिलकी वाढविणे हा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. विविध घटकांना एकत्र आणून सामाजिक सलोखा निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला.या कार्यक्रमाला राहुल महाजन, स्वप्नील पवार, कांतीलाल महाजन, डॉ. गुरुदत्त पाटील, बाळू महाजन, गंभीर महाजन, रमेश पाटील, चंद्रकांत पाटील, योगेश पाटील, कमलाकर माळी, दत्ता पाटील, मेघनाथ पाटील, कृष्णा पाटील, हर्षल पाटील, सनी मोरे यांच्यासह विविध शाळांतील विद्यार्थी- विद्यार्थिनी, चिनावल मंडळातील आठ गावांतील नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दातृत्वाचा धनी हरपला! दत्ता मेघे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग** : ज्येष्ठ नेते, माजी मंत्री दत्ताभाऊ मेघे यांच्या निधनाने दातृत्वाचा धनी हरपला आहे. शिक्षण संस्थांचे जाळे आणि प्रचंड मोठे सामाजिक कार्य उभे करताना त्यांच्या संपूर्ण राजकारणात सामान्य माणूस हा कायम केंद्रस्थानी असायचा, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

आपल्या शोकसंदेशात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, दत्ता मेघे यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक जीवनात कायमच सर्वसामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवूनच आयुष्यभर ते कार्यरत राहिले. त्यामुळेच एक लोकनेता अशी त्यांची प्रतिमा होती. विविध शैक्षणिक संस्था उभारून त्यांनी विदर्भातील तरुणांच्या शिक्षणाची सोय तर केलीच आणि या संस्थाही नावारूपाला आणल्या. ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्या संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे एक मोठा आधार ज्येष्ठांना मिळाला. दातृत्व हे दत्ताभाऊंचे वैशिष्ट्य होते. अनेक गरिबांवर त्यांनी



मोफत उपचार सुविधा उपलब्ध करून दिल्या. एक आदर्श राजकारणी म्हणून त्यांची ख्याती होती. वर्धा, नागपूर-विदर्भातील विकासाच्या राजकारणात त्यांनी कधीही पक्षीय भेद आणला नाही. सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यात सुद्धा त्यांचा सदैव पुढाकार असायचा. नव्या पिढीचे मार्गदर्शक म्हणून त्यांनी भूमिका बजावली. म्हणूनच सर्वच राजकीय पक्षात त्यांचे चाहते आहेत, हेच त्यांच्या यशाचे गमक. माझे त्यांच्याशी कौटुंबिक संबंध होते. अनेक प्रश्नांवर वडिलकीच्या नात्याने ते मार्गदर्शन करायचे. त्यांच्या निधनाने माझी वैयक्तिक हानी झाली आहे. दत्ताभाऊंना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

## सिल्लोडच्या 'इंद्रराज'चा वैद्यकीय क्षेत्रात डंका; कर्करोग संशोधनाला 'इंडियन पेटंट' मंजूर महाविद्यालयाच्या चार प्राध्यापकांचे जागतिक यश; २० वर्षांसाठी पेटंट बहाल

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** शहरातील इंद्रराज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाशी संबंधित संशोधकांनी स्तनाच्या कर्करोगावरील उपचारासाठी अत्यंत प्रभावी संशोधन करून जागतिक स्तरावर मोठे यश संपादन केले आहे. डॉ. जयसिंग दिनोरे, डॉ. अजित येळवंडे, डॉ. हर्षल पाटील आणि डॉ. मनोजकुमार चोपडे या चौघांच्या "डॉक्सोरुबिसिनचे टॉपिकल जेल संयोजन व त्याच्या तयारीची पद्धत" या संशोधनाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून अधिकृत पेटंट (क्रमांक: ५८३९९८) मंजूर करण्यात आले आहे.



**संशोधनाचे मुख्य वैशिष्ट्य:**

या संशोधनात संशोधकांनी 'डॉक्सोरुबिसिन' या औषधाचे 'थर्मोसेंसिटिव्ह' टॉपिकल जेल विकसित केले आहे. यामध्ये 'ग्लोचिडोनॉल' या घटकाचा वापर केल्यामुळे औषधाची कार्यक्षमता, स्थिरता आणि त्वचेमधील शोषण क्षमता वाढली आहे. हे जेल लावल्यामुळे औषध शरीरात हळूहळू आणि दीर्घकाळ परिणामकारक राहते. परिणामी, कर्करोगाच्या रुग्णांना द्यावा लागणारा डोस कमी होऊन उपचारातील गुंतागुंत कमी होण्यास मदत होणार आहे.

पेटंट कायदा १९७० च्या तरतुदीनुसार हे पेटंट २० वर्षांच्या कालावधीसाठी वैध असून, हे संशोधन विविध प्रकारच्या कर्करोग व्यवस्थापनासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. सदर पेटंट १६ फेब्रुवारी २०२५ रोजी दाखल करण्यात आले होते व १९ मार्च २०२६ रोजी त्यास अधिकृत मंजुरी मिळाली आहे.

संशोधकांच्या या ऐतिहासिक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार उत्तमसिंह पवार आणि सचिव अशोक देवरे यांनी सर्व संशोधकांचे विशेष कौतुक केले आहे. ग्रामीण भागातील संशोधकांनी वैद्यकीय क्षेत्रात केलेले हे काम भूषणावह असल्याचे त्यांनी नमूद केले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरुदत्त राजपूत, उपप्राचार्य डॉ. व्यंकटेश लांब, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. संतोष चौथाईवाले, कार्यालयीन अधीक्षक श्री. किरण राजपूत व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# सावधान! तुम्ही खात असलेला 'रामकंद' हा तर विदेशी 'घायपात'चा बुंधा!

(संशोधकांचा धक्कादायक खुलासा; काथ आणि साखरेचे पाणी वापरून भाविकांची फसवणूक)

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड:-चैत्र महिन्यातील यात्रा-उत्सवांमध्ये 'रामकंद' नावाचा एक भलामोठा कंद ४० ते ५० रुपये चकती दराने विकला जातो. प्रभू श्रीराम वनवासात असताना हा कंद खात असत, असा दावा करत भाविकांच्या श्रद्धेशी खेळ केला जात आहे. मात्र, वनस्पतिशास्त्रज्ञ आणि पर्यावरण अभ्यासकांनी दिलेल्या माहितीनुसार, बाजारपेठेत विकला जाणारा हा पदार्थ कोणताही नैसर्गिक कंद नसून, तो विदेशी 'घायपात' (Agave Sisalana) या वनस्पतीच्या बुंध्याचा (खोडाचा) भाग असल्याचे वैज्ञानिक सत्यातून उघड झाले आहे.

केरळ किंवा हिमालयातून हा कंद आणल्याचे भासवून त्याची विक्री केली जाते. प्रत्यक्षात, डोंगरउतारावर आढळणाऱ्या घायपात या झुडूपवर्गीय वनस्पतीच्या खोडाची वरची साल खरवडून ती गुळगुळीत केली जाते. त्यानंतर काथ आणि पाण्याचा मुलामा देऊन त्याला नैसर्गिक तपकरी रंग दिला जातो. त्यात छिद्रे पाडून साखरेचे पाणी मुरवून गोडवा आणला जातो, अशी माहिती



पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांनी दिली आहे.

**काय आहे 'रामकंदा'चे वैज्ञानिक वास्तव?**

मूळ प्रजाती: हे प्रत्यक्षात 'घायपात' (Agave Sisalana) नावाचे विदेशी झुडूप आहे.

कृत्रिम रंग: काथ आणि पाण्याचा वापर करून याला बनावट तपकरी रंग दिला जातो.

बनावट गोडवा: खोडात छिद्रे पाडून साखरेचे पाणी मुरवून चव बदलली जाते.

आरोग्य सतर्कता: यात 'ऑक्झॅलेट'चे प्रमाण जास्त असल्याने घसा खवखवणे किंवा सूज येऊ शकते.

**रामायणाशी संबंध नाही!**

**"निसर्गात 'रामकंद' नावाची कोणतीही वनस्पती नाही. घायपात ही विदेशी वनस्पती असून केवळ आर्थिक फायद्यासाठी तिचे खोड 'रामकंद' म्हणून विकले जात आहे. यात ऑक्झॅलेटचे क्षार अधिक असल्याने घसा खवखवणे, सुजणे असे त्रास होतात. नागरिकांनी अशा दिशाभूल करणाऱ्या दाव्यांना बळी पडू नये."**

**— डॉ. संतोष पाटील, पर्यावरण अभ्यासक.**

अभ्यासकांच्या मते, रामायण काळात दंडकारण्यात अनेक पौष्टिक कंदमुळे उपलब्ध होती, मात्र आज विकला जाणारा हा पदार्थ पूर्णपणे मानवनिर्मित प्रक्रियेतून तयार केलेला असून त्याचा रामायणाशी कोणताही शास्त्रीय संबंध नाही. कोल्हापूर येथे भरवण्यात आलेल्या कंदमूळ प्रदर्शनातही या 'घायपात'च्या खोडावर प्रकाश टाकून सत्य मांडण्यात आले होते.

## पनवेलच्या निहाल भोईरला अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेत कांस्य पदक; रायगड जिल्ह्यासाठी ऐतिहासिक कामगिरी; श्रीजय भगतचा 'टॉप ८' मध्ये समावेश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल | प्रतिनिधी :** जालंधर (पंजाब) येथे पार पडलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या खेळाडूंनी आपली मोहोर उमटवली आहे. 'तायक्वांडो असोसिएशन ऑफ पनवेल शहर'चा खेळाडू कु. निहाल संजय भोईर याने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात अटीतटीच्या लढतीत कांस्य पदक पटकावले. याच स्पर्धेत श्रीजय हरेश्वर भगत याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत 'टॉप ८' मध्ये स्थान मिळवले आहे.



अखिल भारतीय स्तरावर रायगड जिल्ह्याला अशा प्रकारचे यश मिळण्याची ही पहिलीच वेळ असल्याने संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. या दोन्ही खेळाडूंनी आपल्या कष्टाच्या जोरावर पनवेलचे नाव राष्ट्रीय क्रीडा नकाशावर कोरले आहे.

**सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव**

या ऐतिहासिक यशाबद्दल पनवेल महानगर पालिकेच्या नगरसेविका दर्शना भोईर, जेष्ठ पत्रकार तथा रिपाइं पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांच्यासह तायक्वांडो क्षेत्रातील मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. यामध्ये तायक्वांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप ओंबासे, सरचिटणीस अमजदखान (गफार) पठाण, आणि खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी यांनी देखील अभिनंदन केले आहे तसेच पनवेल शहर तायक्वांडो असोसिएशनच्या अध्यक्षा ॲड. प्रज्ञा संदीप भगत, सचिव संजय नागा भोईर, खजिनदार हेमंत कोळी, सहसचिव संदीप भगत, वीर तायक्वांडो असोसिएशनचे अध्यक्ष हरेश्वर भगत आणि सदस्य निखिल भोईर यांनी या खेळाडूंच्या जिद्दीचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# मूल्यवर्धन' उपक्रमाचे तालुक्याकडून विशेष कौतुक; शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडून शाळांची पाहणी

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी कळमनुरी :** विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये रुजवण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या 'मूल्यवर्धन' उपक्रमाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी आज शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक शाळांना भेटी देऊन उपक्रमाचे सखोल निरीक्षण केले. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांमधील सकारात्मक बदल पाहून अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आणि शांतिलाल मुथा फाउंडेशनच्या सहकार्याने जिल्हाभरात मूल्यवर्धन कार्यक्रम राबविला जात आहे. या अंतर्गत शाळांमध्ये राबवल्या जाणाऱ्या विविध कृती, मूल्य सभा आणि लोकशाही मूल्यांच्या रुजवणुकीबाबत आज जिल्हा परिषद शाळा दांडेगाव येथेगोविंद डवरे शिक्षण विस्तार अधिकारी व विजय खुडे तालुका समन्वयक कळमनुरी ] यांनी प्रत्यक्ष वर्गात जाऊन वर्ग शिक्षक अर्चना डहाळे वर्ग 5वा मूल्यवर्धन उपक्रम घेताना निरीक्षण केले.

प्रसंगी अधिकाऱ्यांनी खालील बाबींवर विशेष भर दिला:

विद्यार्थी सहभाग: वर्गातील मूल्यवर्धन उपक्रमात विद्यार्थी किती उत्साहाने सहभागी होतात याचे निरीक्षण करण्यात आले.



शिक्षक नियोजन: शिक्षकांनी तयार केलेली मूल्यवर्धन दैनंदिनी आणि नियोजित कृती आराखड्याची पाहणी केली.लोकशाही मूल्ये: स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची ओळख विद्यार्थ्यांना खेळाच्या आणि संवादाच्या माध्यमातून कशी दिली जाते, हे प्रत्यक्ष पाहिले.

यावेळी मुख्याध्यापक मूल्यवर्धनतालुका समन्वयक विजय खुडे शिक्षक वृंद उपस्थित होते. भेटीच्या शेवटी अधिकाऱ्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "केवळ पाठ्यपुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक बनवण्यासाठी मूल्यवर्धन हा पाया आहे." या यशस्वी भेटीबद्दल शिक्षक यांनी आभार मानले व प्रत्येक शाळेवर जाऊन शिक्षक यांना उपक्रम घेण्यासाठी मदत करीत असलेले विजय खुडे मूल्यवर्धन तालुका समन्वयक यांचेही कौतुक केले.

# चवदारतळे सत्याग्रह शताब्दी महोत्सव देशभर साजरा करणार - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी -** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळे येथे केलेल्या पाण्याचा सत्याग्रह हा ऐतिहासीक आणि युगप्रवर्तक सत्याग्रह होता. सामाजिक विषमतेवर मात करुन समतेच्या युगाचा आरंभ करणारा चवदारतळे सत्याग्रह ठरला आहे. हा मानवमुक्तीचा संगर संपूर्ण जगाला प्रेरणादायी आहे. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या वतीने पुढील वर्षी चवदार तळे सत्याग्रहाचा शताब्दी महोत्सव संपूर्ण देशात साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केली.

महाड चवदार तळे क्रांतीभूमीतील क्रांतीस्तंभाजवळ रिपब्लिकन पक्षाच्या वतीने चवदार तळे सत्याग्रहाच्या 99 व्या वर्धापन दिनानिमीत्त आयोजित जाहीर सभेत ना.रामदास आठवले बोलत होते. यावेळी राज्यसभेत तीनवेळा बिनविरोध निवड झाल्याबद्दल केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांचा रायगड जिल्हा रिपब्लिकन पक्षाच्या वतीने भव्य



सत्कार करण्यात आला. रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड, संपर्क प्रमुख राहुल सोनावले, राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, उपमहापौर परशुराम वाडेकर; मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अशोक बापु गायकवाड, सुमित मोरे ; महिला आघाडीच्या राज्य अध्यक्षा चंद्रकांता सोनकांबळे; पनवेल महानगरपालिका क्षेत्र अध्यक्ष प्रभाकर कांबळे, पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे, पनवेल महानगर पालिका कार्याध्यक्ष प्राध्यापक मोहन गायकवाड, विवेक पवार आदि अनेक मान्यंवर उपस्थित होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्माला आले नसते तर आपण कुठेच नसतो . महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे आपण संसदेमध्ये आणि केंद्रात मंत्री म्हणून पोहचु शकलो. चवदार तळे सत्याग्रहामुळे अस्पृश्यता नष्ट होवून दलितांना मानवतेचे अधिकार मिळाले. त्यामुळे चवदार तळे सत्याग्रह हा जगभरातील मानवी हक्क लढ्यासाठी प्रेरणादायी आहे. समतेच्या हक्कासाठी प्रेरणादायी आहे असे ना.रामदास आठवले म्हणाले.

यावेळी रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांनाही ना.रामदास आठवले यांनी पक्षबांधणी करण्याचे कडू डोस दिले.रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांनी यापुढे मित्रपक्षाच्या निवडणुक चिन्हांवर निवडणुक लढु नये. रिपब्लिकन पक्षाने मोठया प्रयत्नाने रिपब्लिकन पक्षासाठी गन्ना किसान (ऊस शेतकरी) हे निवडणुक चिन्ह मिळवले आहे. आगामी पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला गन्ना किसान हे निवडणुक चिन्ह मिळालेले आहे. त्यामुळे मित्रपक्षांबरोबर आपण राहु, मात्र मित्रपक्षाच्या भरवशावर निवडणुका जिंकणे हे योग्य नाही. कार्यकर्त्यांना आयते काही मिळणार नाही. त्यासाठी त्यांना कष्ट करावे लागतील, कष्ट करुन मतदारसंघ बांधले पाहिजे. स्वबळावर निवडणुका जिंकण्याची हिम्मत ठेवली पाहिजे. मित्रपक्षाच्या भरवशावर आणि मित्रपक्षाच्या चिन्हांवर निवडणुका लढणे आता कार्यकर्त्यांनी बंद केले पाहिजे. रिपब्लिकन पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व आणि ताकद दाखवून दिली पाहिजे असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले.

# “माजी आमदार ॲड. विजयराव जाधव यांचे कार्यकर्त्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन; अंत्योदय, शिस्त आणि सेवाभावाचा दिला मंत्र”

## प्रशिक्षण महाअभियानातून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य; युवकांना सकारात्मकतेचा संदेश

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम भारतीय जनता पार्टीतर्फे आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानाच्या उद्घाटन प्रसंगी महेश भवन, वाशिम येथे उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला माजी आमदार ॲड. विजयराव जाधव यांनी उपस्थित राहून कार्यकर्त्यांना सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर जाधव यांनी आपल्या मार्गदर्शनात उपाध्याय यांच्या ‘अंत्योदय’ या विचारसरणीचे महत्त्व अधोरेखित करत, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवणे हीच खरी राजकारणाची दिशा असल्याचे स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, कोणतेही मजबूत संघटन उभारण्यासाठी शिस्त, निष्ठा आणि सातत्यपूर्ण कार्य आवश्यक असते. भाजपा कार्यकर्त्यांनी केवळ राजकारणापुरते मर्यादित न राहता समाजसेवा, राष्ट्रनिष्ठा



आणि जनतेशी सातत्यपूर्ण संवाद यावर भर द्यावा. याच माध्यमातून कार्यकर्त्यांची खरी ओळख निर्माण होते आणि जनतेचा विश्वासही संपादन करता येतो.

युवकांना उद्देशून त्यांनी विशेष आवाहन करताना सांगितले की, सकारात्मक विचार, प्रामाणिकपणा आणि समर्पणभाव या गुणांच्या जोरावर संघटनेला अधिक बळकटी देता येते. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे ही प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी आहे,

**“कार्यकर्त्यांनी समाजाशी नाळ जोडून सेवा हीच आपली ओळख बनवावी. अंत्योदयाच्या विचारातून शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्याची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी. सकारात्मकता, प्रामाणिकपणा आणि समर्पणभाव यांच्या जोरावरच संघटना अधिक बळकट होईल.”**

**– माजी आमदार ॲड. विजयराव जाधव**

असेही त्यांनी नमूद केले.

या प्रशिक्षण महाअभियानामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य, नवीन दिशा आणि आत्मविश्वास निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी कार्यकर्त्यांना आगामी काळात अधिक जोमाने कार्य करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह, शिस्त आणि संघटनात्मक ताकद याचे दर्शन घडले.

# पनवेल तालुक्यातील रिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न; वाहतूक नियमांवर भर

**दैनिक युवक आधार**

**मच्छिंद्र पाटील पनवेल प्रतिनिधी** : पनवेल, दि. 23 मार्च 2026 – पनवेल तालुक्यातील विविध भागांतील रिक्षा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक सोमवार, दि. 23 मार्च रोजी ट्राफिक डीसीपी तिरुपती काकडे साहेब त्यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोली येथील सुधागड हायस्कूलमध्ये पार पडली. या बैठकीस पनवेल, नवीन पनवेल, कळंबोली, खारघर, खांदेश्वर, मानसरोवर (कामोठे), करंजाडे आणि चिंचपाडा परिसरातील रिक्षा प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत रिक्षा चालकांकडून होत असलेल्या वाहतूक नियमांच्या उल्लंघनाबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेत मार्गदर्शन केले. प्रवाशांना भाडे नाकारणे, फ्रंट सीटवर प्रवासी बसवणे, युनिफॉर्म न घालणे, प्रवाशांशी असभ्य वर्तन करणे यांसारख्या तक्रारी वाहतूक शाखेकडे वारंवार प्राप्त होत असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.बैठकीदरम्यान रिक्षा प्रतिनिधींनीही आपल्या समस्या मांडल्या. मीटर संदर्भातील अडचणी, सीएनजी सिलिंडर टेस्टिंग,




तसेच प्रवाशांशी संबंधित विविध मुद्दे त्यांनी अधिकाऱ्यांसमोर मांडले. या सर्व समस्यांवर संबंधित अधिकाऱ्यांनी सविस्तर मार्गदर्शन करून योग्य उपाययोजना सांगितल्या.

या बैठकीस RTO अधिकारी माळवे साहेब, कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ अधिकारी अजय भोसले, पनवेल वाहतूक शाखेचे औदुंबर पाटील तसेच कळंबोली वाहतूक शाखेचे पी.एस. आय. साठे साहेब खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ गुलफारोज मुजावर उपस्थित होते. सर्व अधिकाऱ्यांनी रिक्षा चालक व प्रतिनिधींना नियमांचे महत्त्व पटवून देत शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्थेसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. बैठकीच्या शेवटी रिक्षा प्रतिनिधींनी वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आश्वासन देत अधिकाऱ्यांचे आभार मानले.

# डोंगरगावात ईदचा 'गोडवा'; शिरखुर्म्याच्या दावतीतून जोपासला सलोखा

## हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत साजरा केला सण; राष्ट्रीय एकात्मतेचा दिला संदेश

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर सिल्लोड :-** तालुक्यातील डोंगरगाव येथे पवित्र रमजान ईदचा सण अत्यंत उत्साहपूर्ण आणि सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने गावात केवळ धार्मिक सणच साजरा झाला नाही, तर हिंदू-मुस्लिम भाईचाऱ्याचे एक अनुपम दर्शन घडले. मुस्लीम बांधवांनी आपल्या हिंदू बांधवांना स्नेहाने



घरी निमंत्रित करून दिलेल्या शिरखुर्म्याच्या दावतीने सामाजिक ऐक्याचा नवा आदर्श समोर ठेवला आहे.पवित्र रमजान महिना संपल्यानंतर साजरी होणाऱ्या ईदनिमित्त डोंगरगावात घरोघरी शिरखुर्म्याची मेजवानी देण्यात आली होती. विशेषतः निसार पठाण, हन्नान पठाण, सुभान शहा, नाजिम पठाण, वकील पठाण, रिजवान पठाण, इमरान पठाण, जावेद पठाण आदींसह अनेक मुस्लीम बांधवांनी आपल्या हिंदू मित्र, शेजारी आणि ग्रामस्थांसाठी शिरखुर्म्याची खास दावत आयोजित केली होती. यावेळी गावातील सर्वधर्मीय नागरिकांनी एकमेकांना गळाभेट देऊन शुभेच्छांचा वर्षाव केला.

या उपक्रमातून गावात सामाजिक सलोखा आणि परस्पर प्रेमाचे एक सुंदर चित्र पाहायला मिळाले. "आमच्या गावात सर्व सण-उत्सव नेहमीच गुण्यागोविंदाने एकत्र साजरे करण्याची परंपरा आहे. आजच्या शिरखुर्म्याच्या दावतीमुळे हा स्नेह अधिक वृद्धिंगत झाला असून, समाजात बंधुभाव टिकवून ठेवण्याचा आमचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली . डोंगरगावने दिलेला हा राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश सध्या परिसरात कौतुकाचा विषय ठरला आहे.

# व्यावसायिक सिलेंडर 5 हजार रुपयांना

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** व्यावसायिक सिलेंडर बंद झाल्याने पनवेल परिसरात व्यावसायिक सिलेंडरच्या विक्रीमध्ये काळाबाजार होत असल्याचे दिसत आहे. तब्बल पाच हजार रुपयांच्या पुढे व्यावसायिक सिलेंडरची विक्री केली जात आहे. तर काही ठिकाणी घरगुती सिलेंडरचा वापर होत आहे. युद्धामुळे व्यावसायिक सिलेंडर देणे बंद करण्यात आले आहे, मात्र तरीदेखील या सिलेंडरची काळ्या बाजारात विक्री होत आहे. अनेक हॉटेल व्यावसायिक हे सिलेंडर काळ्या बाजारात खरेदी करत आहेत. पनवेल पुरवठा विभागाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. वडापाव विक्रेते, भेळ विक्रेते, चहा हॉटेल, हॉटेल चालक, इडली, ढाबे चालक यासह अनेक व्यवसाय पनवेलमध्ये व्यवसाय करत आहेत. त्यातील अनेकांनी 5000 पेक्षा अधिक रुपये खर्च करून व्यावसायिक सिलेंडर घेतले आहेत. त्यामुळे त्यांचे व्यवसाय सुरू आहेत. काळ्या बाजारातून सिलेंडर घेतल्याने साहजिकच वस्तूंचे देखील भाव वाढवले आहेत. प्रत्येक वस्तूचे पाच ते दहा रुपये भाव वाढवण्यात आले आहेत.तालुक्यातील परिसरातील नागरिकांना गॅस एजन्सीमध्ये सिलेंडर करीता ग्राहकांना चकरा माराव्या लागत आहे तर दुसरीकडे तालुक्यातील काही हॉटेल व्यावसायिक तसेच चहा टपरी व्यावसायिक यांच्याकडून घरगुती वापरातील गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणात दुकानावर अवैध वापर सुरू आहे. विशेषत: महामार्गावर असलेले हॉटेल व्यावसायिक यांच्यावर कारवाई मात्र शून्य दिसून येत आहे.

# धोबी, परिट समाजाच्या वध-वर परिचय मेळाव्याची कार्यकारिणी जाहीर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी (अरविंद पांचाळ) :** दि. २२ मार्च नांदेड येथील शिवाजीनगर परिसरातील हॉटेल विसावा येथे नॅशनल धोबी महासंघ, महाराष्ट्र राज्य परिट धोबी सेवा मंडळ व डेबुजी सेना यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याच्या नियोजनाबाबत बैठक संपन्न झाली.

या बैठकीत सर्वानुमते राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा रविवार,दि. २४ मे २०२६ रोजी हॉटेल विसावा, शिवाजीनगर (नाना-नाणी पार्कजवळ), नांदेड येथे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीदरम्यान अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले. यावेळी मेळाव्यासाठी खालीलप्रमाणे नियोजन समिती जाहीर करण्यात आली:अध्यक्ष : जेष्ठ समाजसेवक तथा नॅशनल धोबी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष वामनराव पेनूरकर

उपाध्यक्ष : राजेश इभुते मांजरमकर, माधवराव फुलवळकर, गणेश शिल्लेवाड, जयप्रकाश काकांडिकर, लक्ष्मणराव कोपरे

सचिव : प्रमोद भडारे (डेबुजी फोर्स), नारायण तेलंग दाताळकर, मुंजाजी काकांडिकर

सहसचिव : बाबुराव कलूरे (जिल्हाध्यक्ष, नॅशनल धोबी महासंघ), मार्तंड भंडारे, राजू येवले, करण तेलंग, पिंटूभाऊ मारवाडीकर, गुणाजी संभाजी गोरटेकर, शिवाजी काकांडिकर

कार्यक्रम स्वागत अध्यक्ष : डॉ. पांडुरंग इभूतवार

महिला स्वागत अध्यक्ष : डॉ. इभूतवार ताई

जेष्ठ मार्गदर्शक : मा. मारोतराव सुरुंगवाड

सल्लागार : सुनील लोणवडे (जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य धोबी सेवा मंडळ), गोविंदराव माचनवार, ओबीसी नेते एस. जी. माचनवार

आयोजक : संतोषजी औंढेकर (मराठवाडा अध्यक्ष), कोंडीबा मांजरमकर (उपाध्यक्ष)

इतर प्रमुख उपस्थित : श्रीनिवास पांचाळ, रमेश बर्डे, देवगुरू पंडितजी, राजीव संतराम होळकर, सुरेश नागनाथ सावळीकर, विठ्ठल भंडारे, विशाल कोवटेकर, लक्ष्मण महादू कोपरे, विक्की फुलवळकर, मारोतराव तेलंग (कोठा) आदी.या वेळी समाजातील युवक-युवती व पालकांनी मोठ्या संख्येने वधू-वर परिचय मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

# ईदच्या निमित्ताने रिसोडमध्ये जुळली मनं; अर्जुन पाटील खरात यांची अतीक खान यांच्या घरी आपुलकीची भेट”

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/रणजीतसिह ठाकुर** : रिसोड (वाशीम)रमजान ईदच्या पवित्र सणानिमित्त रिसोड शहरात सामाजिक एकतेचा आणि बंधुत्वाचा सुंदर आदर्श पाहायला मिळाला. रिसोड सिटी न्यूजचे मुख्य संपादक तथा संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अर्जुन पाटील खरात यांनी रिसोड सिटी न्यूजचे शहर प्रतिनिधी अतीक खान यांच्या निवासस्थानी भेट देत त्यांना ईदच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या आपुलकीच्या भेटीत स्नेह, आदर आणि परस्पर सलोख्याचे वातावरण निर्माण झाले. विविध समाजघटकांतील मान्यवर एकत्र येऊन सण साजरा करत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. सर्वांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा देत बंधुत्वाचा



संदेश दिला.

यावेळी दैनिक युवक आधारचे वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे, नसेर खान, संदीप पंडित यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी पारंपरिक शीरखुर्म्याचा आस्वाद घेत सणाचा आनंद द्विगुणित केला.

या भेटीतून “धर्म वेगळे असले तरी मनं एकत्र असावीत” हा सामाजिक ऐक्याचा

**“ईद हा केवळ एका धर्माचा सण नसून तो माणुसकी, प्रेम आणि बंधुत्वाचा संदेश देणारा सण आहे. समाजात एकता आणि सौहार्द टिकवणे ही आजची मोठी गरज आहे. अशा सणांच्या माध्यमातून आपण एकमेकांच्या अधिक जवळ येतो, भेदभाव विसरतो आणि माणुसकी जपतो. सर्वांनी एकत्र येऊन समाजात शांतता आणि बंधुत्व वाढवावे, हीच ईदनिमित्त माझी सर्वांना शुभेच्छा.”**

**अर्जुन पाटील खरात**
**मुख्य संपादक रिसोड सिटी न्यूज**

संदेश देण्यात आला. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे समाजात प्रेम, सौहार्द आणि एकतेची भावना अधिक दृढ होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# मिठागर कांदळवन तोड; क-समरी अहवाल फेटाळून न्यायालयाने केले ‘सरकारवर’ कान टोचणे

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : रायगड जिल्ह्यातील मिठागर येथील कांदळवन (मँग्रोव्हज) तोड प्रकरणावर न्यायालयीन हस्तक्षेपच नव्हे, तर पोलीस–वन–महसूल यंत्रणेच्या कथित ढिलाईवर थेट शासनाला कान टोचणारे दडफडते प्रकरण बनले आहे. ५ जुलै २०२४ रोजी मुरुड पोलिसांत गु.र.नं. १०६/२०२४ अंतर्गत दाखल झालेल्या या गुन्ह्याचा तपास पूर्ण करून मुरुड पोलिसांनी क-समरी अहवाल न्यायालयात सादर केला होता. मात्र, माननीय न्यायालयाने हा अहवाल मान्य करण्याऐवजी फेटाळून गेला व पुन्हा तपास करण्याचे आदेश दिले आहेत. पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत दाखल हा गुन्हा केवळ वृक्ष तोडच नसून, भूसंपादन, भराव, अनधिकृत बांधकाम आणि वनखात्याच्या अनुज्ञेविना झालेला हस्तक्षेप यासहित एक व्यापक कायदेशीर अवैधतेचा प्रकार आहे. तपास अधिकारी म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) रसेडे आणि पोलीस उपनिरीक्षक (PSI) राठोड यांच्याकडे या प्रकरणाची जबाबदारी देण्यात आली असून, त्यांच्या तपासात पोलिसांनी २१ फेब्रुवारी २०२५ रोजी गुन्ह्याचा तपास थांबवून अहवाल सादर केल्याचे दिसते. न्यायालयाने २४ फेब्रुवारी २०२५ रोजी आदेश देऊन तपास पुन्हा सुरू करण्यास सांगितले, ज्यामुळे हे प्रकरण अद्याप ‘तपासावर’ आहे.

**तपासातील गाफ आणि RTI ने उघड केलेल्या त्रुटी**

तक्रारदार महेश जानू ठाकूर यांनी या गुन्ह्याच्या तपासातील त्रुटी उघड करण्यासाठी माहिती अधिकार अर्ज दाखल केला होता. त्यांनी १० सप्टेंबर २०२५ रोजी केलेल्या अर्जाला उत्तर देताना “तपास चालू आहे” या कारणाने कलम ८(१)(ज) अंतर्गत माहिती देण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी नकार दिला. याविरुद्ध ठाकूर यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, अलिबाग यांच्याकडे अपील केले, तरीही अपील फेटाळण्यात आले. माहिती अधिकार अर्जातून समोर आलेल्या माहितीनुसार, तपासात आवश्यक असलेल्या साक्षीदारांचे तपासणी, वन खात्याच्या तज्ज्ञ अहवालाची चौकशी




आणि खाजगी स्वामी अधिकारी यांच्याशी संबंधित दस्तावेजांची तपासणी यात अनेक गाफी दिसत आहेत.महेश जानू ठाकूर यांच्या जबाबात या कांदळवन तोडच्या प्रकरणात “सुयोग फार्म” चे मालक संतोष पोवळे यांचा हस्तक्षेप असल्याचा आरोप करण्यात आला आहे. आता न्यायालयाच्या आदेशानंतर या आरोपांची जबाबदारी तपासात योग्य तपासून दोषींवर दोषारोपपत्र दाखल करण्याची अपेक्षा नागरिक, पर्यावरण प्रेमी आणि निसर्गमित्र यांच्याकडून आहे.कायदेशीर व्याप्ती : पर्यावरण, MRTP आणि वनअरण्य कायदा गुन्हा नोंदविण्यात आलेल्या कलमांमध्ये खालील अधिनियमांचा समावेश आहे:पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६: कलम ३(१) आणि १५ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ (MRTP): कलम ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७ वनअरण्य कायदा आणि महसूल नियमांच्या संभाव्य उल्लंघनाशी निगडीत इतर अधिनियम याचा अर्थ असा की, फक्त कांदळवन तोडने असे न राहता, भूसंपादन, भराव, भूमीच्या वापरातील अनधिकृत बदल आणि नियोजन नियमांचे उल्लंघन यासह अनेक पातळ्यांवर हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यामुळे खाजगी भूमी–स्वामी बरोबर वन खात्याचे अधिकारी, महसूल खाते आणि स्थानिक स्वयंशासित संस्थांची भूमिका यांचीही चौकशी आवश्यक आहे.

**"रेवदंडा, आगरकोट किल्ला आणि पैशाच्या ‘पाकिटांची’ गप्प तोंडे"**

मिठागरचे प्रकरण रायगड जिल्ह्यातील इतर अनेक भागांशी जोडले जाऊ शकते. अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथेही कांदळवन तोडून उभारलेल्या भराव आणि अनधिकृत बांधकामांचे प्रकरण उघडकीस आले आहेत. तेथील लोकांच्या बोलण्यानुसार, “पैशाच्या जोरावर सरकारी अधिका-यांचे तोंड गप्प करण्यात आले आहे.” रेवदंड्यातील आगरकोट किल्ला आणि त्याच्या आसपासच्या खार जमिनीच्या अतिक्रमणांच्या प्रकरणांमध्येही वनखात आणि महसूल खात्याच्या अधिका-यांच्यावर गप्प राहण्याचा आरोप लोकांत खुलेआम केला जात आहे. हे प्रकरण मिठागरच्या घटनेसाठी एक वास्तविक पार्श्वभूमी तयार करते.शासनावर थेट दडफड आणि अधिवेशनात दखलीची मागणी.महाराष्ट्र राज्याचे महसूल सचिव विकास खारगे, वन खात्याचे सचिव श्री वेणुगोपाल रेड्डी आणि महाराष्ट्र गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती मनीषा म्हैसकर–पाटणकर यांच्याकडे आता जनतेचा दबाव आहे. फक्त खाजगी भूस्वामी–ठेकेदार वर नव्हे, तर या गुन्ह्यात वन, महसूल आणि पोलीस यंत्रणेच्या अधिकार्यांवर थेट दोषारोपपत्र दाखल होण्याची आणि शासनाच्या निर्णयक्षम यंत्रणेवर दाखल होणारी जबाबदारी हे राजकीय–प्रशासकीय दृष्टिकोनातून फक्त “पर्यावरण संवेदनशीलता” नव्हे, तर “सरकारी निष्क्रियतेचा खुलासा” बनला आहे.

राज्याचे विधानसभा अधिवेशन चालू असताना, या प्रकरणाची विधिमंडळात दखल घेण्याची गरज आहे. विरोधी आमदार, निसर्ग–पर्यावरण समिती आणि रायगड–अलिबागच्या आमदारांनी या प्रकरणाची चर्चा विधानसभेत करून, शासनाकडून या गुन्ह्याच्या तपासात बाधा न येणारी स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशी करण्याची मागणी केली पाहिजे.

त्यांनी याबाबत विशेष तोंडवळ्यांवरील प्रश्न, तात्काळ चर्चा आणि विधानसभा समितीसमोर हजर होणाऱ्या बाबींच्या माध्यमातून हे प्रकरण राज्याच्या धोरणात्मक पातळीवर आणले पाहिजे. तसेच, केवळ अटक–कारवाई दाखविण्यापुरते असणारे शासनाचे नियम व विधानसभेतील चर्चा यांच्यात जर फरक निर्माण झाला, तर न्यायालयाच्या आदेशाचा अर्थ हवा–पाण्यातच विरून जाईल; म्हणून ही बाब गांभिर्याने घेऊन, शासनाने या प्रकरणातील दोषी–अधिकाऱ्यांवर त्वरित कायदेशीर कारवाई आणि दाखल गुन्हे यांची स्पष्ट यादी विधानसभेत मांडणे गरजेचे आहे.

## पोलिसांची दडपशाही;वंचितचे जिल्हा महासचिव डी जी रंगारी, जिल्हा महिला अध्यक्षा तनुजा नागदेवे यांना अटक

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा** -नागपूर येथे आरएसएसच्या मुख्यालयावर वंचित बहुजन आघाडीचे एडवोकेट बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात येणार आहे. पंतप्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणी करिता मोर्चा होता पंतप्रधानाचे नाव एफस्टीन फाईल व आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव मलिन झाले आहे .त्यामुळे राजीनामा द्यावा हा मोर्चाचा उद्देश होता आज दिनांक 23 मार्च रोजी सकाळी साकोली येथून वंचित बहुजन आघाडीचे



जिल्हा महासचिव डी जी रंगारी सकाळी फिरायला गेले होते .जर्सीवरच असताना पोलीस विभागाचे 5 कर्मचारी त्यांच्या घरी आले . तेवढ्यात काही कार्यकर्त्यांना मी फोन केला होता कशासाठी तुम्ही आम्हाला अटक करता त्यांनी सांगितलं वरून आदेश आहे त्यानंतर मी त्यांना म्हटलं मी अजून तोंड धुवायला आंघोळ करायला आहे कपडे सुद्धा बदलायला आहे नंतर त्यांनी कपडे वगैरे बदलून गाडीत बसून घेऊन गेले व त्यानंतर जिल्हा महिला अध्यक्ष तनुजा नागदेवे यांच्या घरी सकाळी 7 वाजता पोलीस विभागाचे कर्मचारी त्यांना अटक करण्याकरता आले व त्यांना त्यांना विचारले असता की आम्हाला वरून आदेश आहे म्हणून आम्ही तुम्हाला या ठिकाणी ताब्यात घेण्याकरता आलो असं सांगितलं तसेच साकोली तालुका अध्यक्ष जगदीश रंगारी यांना सुधा बोळदे गावी जाऊन पोलीस वाल्यांनी अटक केली अशा पद्धतीने प्रकार वंचित बहुजन आघाडी खपवून घेणार नाही 3 तासानंतर वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्त्यांना सोडून देण्यात आले.

## उमरी येथे डॉ .बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष पदी वसंत सवई तर उपाध्यक्ष पदी अनिल सोनकांबळे यांची निवड

**दैनिक युवक आधार :**

**उमरी वार्ताहर/रुपेशकुमार ग.श्रीरामवार** : विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वा सार्वजनिक जयंती महोत्सवा निमीत्त दि २२मार्च २०२६ रोजी अनिल सोनकांबळे (माजी उपनगराध्यक्ष) यांच्या अध्यक्षतेखाली सांस्कृतिक सभागृह उमरी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी रापतवार नगर,पोर्णीमा नगर, व्यंकटेश नगर, काश्यप बुद्ध विहार परीसर, डॉ.आंबेडकर नगर शहरातील सर्व नगरातील बौध्द बांधव उपस्थित होते.

सर्वानुमते पुढीलप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती गठीत करण्यात आली अध्यक्ष पदी वसंत सवई तर उपाध्यक्ष पदी ए.एस.





सोनकांबळे , कार्याध्यक्ष ईश्वर सवई, सचिव उपेंद्र खंदारे, सहसचिव नागेश सोनकांबळे कोषाध्यक्ष राजेश्वर सवई , संघटक संदिप गोवंदे, कैलास सोनकांबळे, सल्लागार गजानन अडगुलवाड, संदिप लांडगे, अशोक कांबळे, सदस्य रविराज सवई, अजित सोनकांबळे, कपिल सवई, शुभम सोनकांबळे, विशाल खंदारे, गौतम सोफळे, गौतम लांडगे, तरुण वाघमारे, लक्ष्मण सवई, राहुल खंदारे, सिध्दार्थ वाघमारे, चंद्रकांत श्रिकांबळे, चंद्रप्रकाश पवार, मिलिंद सवई, ईश्वर लोखंडे, जयवंत सोनकांबळे, बाळू लांडगे विश्वास कसबे, विकास खंदारे निखिल सोनकांबळे, छकुल खंदारे, गंगाधर सवई, कुणाला सोनकांबळे, किरण कदम, दिपक सवई, अविनाश सवई, संजय सोनटक्के, गौतम सोनटक्के, अदिची निवड करण्यात आली आहे.सदरील नवनिर्वाचित कार्यकर्णिचे पदाधिकारी यांना शुभेच्छा देण्यात आल्या.वसंत सवई यांनी सांगितले की, उमरी शहरातिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी होते पण याही वर्षी एक चांगला उपक्रम राबविण्यात येईल आणि भव्यदिव्य कार्यक्रम कसा होईल याकडे भर दिला जाईल असे आश्वासन नवनिर्वाचित अध्यक्ष वसंत सवई यांनी या बैठकीत केला.

## चिंदर प्रीमियर लीगमध्ये ‘दिशा स्पोर्ट्स’चा स्टार इलेव्हन किताबावर कब्जा

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर/मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील चिंदर गावात आयोजित ‘चिंदर प्रीमियर लीग (CPL)’ क्रिकेट स्पर्धेचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात आणि जल्लोषात पार पडला. या स्पर्धेत ‘दिशा स्पोर्ट्स’ संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत ‘स्टार इलेव्हन चिंदर’चा किताब पटकावला.

ग्रामीण भागातील तरुणांमध्ये क्रीडा संस्कार, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित व्हावेत या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत




विविध संघांनी सहभाग नोंदवत रंगतदार सामने खेळले.

अंतिम सामन्यात ‘दिशा स्पोर्ट्स’ संघाने दमदार कामगिरी करत प्रतिस्पर्धी संघावर मात केली. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही विभागांत संतुलित खेळ करत ‘दिशा स्पोर्ट्स’ने विजेतेपदावर आपले नाव कोरले.

विजेत्या संघाला आकर्षक चषक आणि रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले, तर उपविजेत्या संघालाही पारितोषिक देण्यात आले. सामनावीर व मालिकावीर पुरस्कारांनीही खेळाडूंचा गौरव करण्यात आला.

संघमालक संकेत चिंदरकर आणि कर्णधार प्रतीक जिकमडे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘दिशा स्पोर्ट्स’ संघाने उत्कृष्ट समन्वय साधत ही उल्लेखनीय कामगिरी केली.

या स्पर्धेत लिलेश मांजरेकर, स्वप्नील चिंदरकर, सागर लब्दे, अजय चिंदरकर, गौरव अपराज, गितेश साटम, गणेश लाड, ओंकार साटम, राज शेडगे, सागर परुळेकर, रितेन घाडीगावकर, संतोष देऊलकर व साहिल देऊलकर आदी खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली.

समारोप सोहळ्यास ग्रामस्थ, क्रीडाप्रेमी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील क्रिकेटला नवी दिशा मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## शहीद दिनानिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी दि.२४, ठाणे :** सोमवार दि.२३ मार्च रोजी शहीद दिनानिमित्त जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप



माने, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के- पाटील, शशिकांत गायकवाड, वरूणकुमार सहारे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, तहसिलदार सचिन चौधर, रेवण लेंभे, मीनल दळवी, कार्यकारी दंडाधिकारी पुरुषोत्तम थोरात, लेखाधिकारी आश्लेषा जाधव, राष्ट्रीय सूचना व विज्ञान केंद्राचे संचालक घनश्याम मेहता तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मुरुडमध्ये रमजान ईद उत्साहात साजरी; मानव कल्याणासाठी विशेष दुवा

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण/प्रतिनिधी मोहम्मद** मुरुड : शहरात काल रमजान ईद (ईद-उल-फित्र) मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली. तीस दिवसांच्या पवित्र रोज्यानंतर मुस्लिम बांधवांनी सकाळी मोठ्या संख्येने ईदगाह मशिदीत एकत्र येत ईदची नमाज अदा केली. सणानिमित्त शहरात पहाटेपासूनच आनंद, उत्साह आणि जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळत होते.

नमाज पठणानंतर नय्युम सय्यद मौलाना यांनी मानव कल्याण, देशाची प्रगती तसेच समाजात शांतता, बंधुता आणि सौहार्द नांदावे यासाठी विशेष दुवा (प्रार्थना) केली. त्यानंतर उपस्थितांनी एकमेकांना ‘ईद मुबारक’च्या शुभेच्छा देत सणाचा आनंद साजरा केला. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी नवीन कपडे परिधान करून उत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.सणानिमित्त कायदा व



सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मुरुड पोलीस स्टेशनचे एपीआय अशोक उजगरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी त्यांच्या संपूर्ण टीमने उपस्थित राहून नागरिकांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. द्वितीय पोलीस निरीक्षक नागरगोजे तसेच खोपे, सूर्यवंशी, हिंगमिरे, महेश पवार आदी पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी कार्यरत होते.

तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व युवक काँग्रेसचे कार्यकर्ते व पदाधिकारी तसेच विविध सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठा गजबजलेल्या दिसून आल्या असून नागरिकांनी एकमेकांच्या घरी भेटी देत सणाचा आनंद द्विगुणित केला.

सर्व धर्मीय नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला. रमजान ईदच्या निमित्ताने मुरुड शहरात बंधुता, ऐक्य आणि शांततेचे वातावरण अधिक दृढ झाल्याचे सकारात्मक चित्र पाहायला मिळाले.

## आई-वडील म्हणजे देवाचे रूप,त्यांची सेवा करणे हिच खरी भगवंताची सेवा

### येवती येथे ह भ प बाल किर्तनकार महाराज पाथरे यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**नांदगाव खंडेश्वर/ प्रदिप रघुते :** नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील येवती येथे 55 वर्षी पासून सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन सुरू आहेत

श्री रामनवमी जन्मोत्सव सोहळा निमित्ताने श्री राम मंदिर संस्थान येवती येथे अनेक धार्मिक कार्यक्रम रेलचेल सुरू आहेत,

सकाळी काकाडा दुपारी श्रीमद रामायण कथा ह भ प आसटकर गुरुजी यांच्या सुमधुर वाणितुन कथा गावातील नागरिक व भक्तगन श्रवण करत आहेत,सायंकाळी हरीपाठ आरती व हरीकिर्तन यां कार्यक्रम रोज नित्यनेमाने सुरू आहेत पहिल्या दिवशी किर्तन सेवा ह भ प ओम महाराज पाथरे यांचे किर्तन दुसऱ्या दिवशी ह भ प विशाल महाराज बढे तिसऱ्या दिवशी ह भ प किशोर महाराज काळे चतुर्थ दिवशी ह भ प विष्णु



महाराज सखारामपुर पाचव्या दिवशी ह भ प योगीणीताई वसंतकर सहाव्या दिवशी उमेश महाराज जाधव श्रीराम जन्मोत्सव किर्तन ह भ प धर्माचार्य दादा महाराज पाटील व काल्याचे हरिकीर्तन ह भ प दिनेश महाराज वक्ते यांचे होणार आहेत साथसंगत गायनाचार्य ह भ प विशाल महाराज बुळे गायनाचार्य ह भ प अशोक महाराज गारकर, मृदुंग वादक ह भ प रवीअण्णा महाराज धांडे आळंदी मृदंग वादक विठ्ठल महाराज गिराम सप्त्याहातील होणार आहे,

असे विश्वस्त मंडळाच्या वतीने सांगण्यात आले आहेत, पहिल्या दिवशी किर्तन सेवा ओम महाराज पाथरे यांनी आई वडिलांची सेवा हिच खरी भगवताची भक्ती आहेत आपले आई-वडील हे त्यागाचे मूर्तिमंत रूप आहेत. मुलांच्या सुखासाठी ते स्वतःचे आयुष्य वेचतात, त्यामुळे त्यांची सेवा करणे हे मुलांचे परम कर्तव्य आहे. ज्या घरात आई-वडिलांचा सन्मान होतो, तिथेच लक्ष्मी आणि देवाची कृपा असते. असे घर हे तीर्थक्षेत्रासारखे आई-वडिलांच्या चेहऱ्यावरचे समाधान हेच खरी पूजा आहे. त्यांची सेवा म्हणजे प्रत्यक्ष भगवंताची आराधना आहे, कारण आपल्या अस्तित्वाचे मूळ कारण तेच आहेत. असे प्रतिपादन बालकीर्तनकार ह भ प ओम महाराज पाथरे यांनी केले आहेत

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त उलवे येथे वृक्षारोपण ; “वृक्ष एक जबाबदारी”चा संदेश



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज उलवे नोड मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या प्रांगणात वृक्षारोपणाचा कार्यक्रम जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, सचिन घरत, ज्येष्ठ कार्यकर्ते जयवंत देशमुख, ॲड. राहुल घरत, दर्शन ठाकूर, स्वप्नील ठाकूर, विश्वनाथ कोळी, भार्गव ठाकूर, हेमंत पाटील, रोशन म्हात्रे, हेमंत ठाकूर, दीपक गोंधळी, नंदकुमार ठाकूर, रविकांत म्हात्रे, राजू कोळी, किशोर कोळी, रवींद्र भोईर, विशाल कोळी, राजकिरण कोळी, विनायक कोळी, भरत कोळी, दीपाली म्हात्रे, संदेश कोळी, मंगेश कोळी, संतोष कोळी, सृजन कोळी यांच्यासह इतर पदाधिकारी, शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या रोपांचे लागवड करण्यात आले. यावेळी “ वृक्ष एक जबाबदारी” हा संदेश देत पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्ट अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरात हरिताई वाढण्यास हातभार लागणार असून, सामाजिक बांधिलकी जपणारा हा कार्यक्रम सर्वांच्या स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# सिल्लोडमध्ये उन्हाचा तडाखा; उपजिल्हा रुग्णालयात 'उष्माघात' कक्ष सज्ज

## कडक उन्हामुळे रस्ते पडले ओस; खबरदारी घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
सिल्लोड:-सिल्लोड शहर आणि तालुक्यात मागील काही दिवसांपासून उन्हाचा चटका प्रचंड वाढला असून, वाढत्या तापमानामुळे जनजीवन प्रभावित झाले आहे. या पार्श्वभूमीवर, आरोग्य विभागाने तातडीने पावले उचलली असून सिल्लोड येथील उपजिल्हा रुग्णालयात उष्माघाताच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी स्वतंत्र 'उष्माघात कक्ष' कार्यान्वित करण्यात आला आहे. या विशेष वार्डात ६ बेड राखीव ठेवण्यात आले असून डॉक्टरांचे पथक २४ तास सज्ज असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे आरोग्य अधिकारी डॉ. महेश विसपुते यांनी दिली आहे.



दुपारच्या वेळी तापमानाचा पारा चढत असल्याने शहरातील मुख्य रस्ते आणि बाजारपेठांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळत आहे. विशेषतः महाविद्यालयीन तरुणी आणि नागरिक उन्हाच्या झळांपासून वाचण्यासाठी स्कार्फ, रुमाल, छत्री आणि गॉगलचा वापर करताना दिसत आहेत. वाढते ऊन लक्षात घेऊन प्रशासनाने दुपारी १२ ते ४ या वेळेत विनाकारण घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे.

तज्ज्ञांचा सल्ला: उन्हाळ्यात डोळ्यांची अशी घ्या काळजी

> **"वाढते ऊन लक्षात घेऊन उपजिल्हा रुग्णालयात उष्माघाताच्या रुग्णांसाठी स्वतंत्र वार्ड सुरू करण्यात आला आहे. येथे सहा बेड आरक्षित असून, अशा रुग्णांवर तातडीने उपचार करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची टीम सज्ज ठेवण्यात आली आहे."**
> **— डॉ. महेश विसपुते, आरोग्य अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, सिल्लोड.**
> **"उन्हाळ्यात उष्ण वारे आणि धुळीमुळे डोळ्यांना खाज येणे किंवा संसर्ग होण्याचा (कंजंक्टिव्हायटिस) धोका असतो. अशा वेळी डोळे चोळणे टाळावे आणि संसर्ग जाणवल्यास त्वरित नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा."**
> **— डॉ. विशाल अकाते, नेत्ररोगतज्ज्ञ, इंदुमती हॉस्पिटल, सिल्लोड.**

प्रखर उन्हापासून संरक्षण: सूर्याची अतिनील किरणे डोळ्यांसाठी घातक असतात. बाहेर पडताना नेहमी चांगल्या प्रतीचे सनग्लासेस आणि टोपीचा वापर करावा.

डोळ्यांना हायड्रेटेड ठेवा: शरीरातील पाणी कमी झाल्याचा परिणाम डोळ्यांवर होतो. दिवसातून किमान ८-१० ग्लास पाणी प्यावे आणि डोळ्यांवर थंड पाण्याचे हबके मारावेत.

'ड्राय आय' पासून बचाव: एसी किंवा कुलरची थेट हवा डोळ्यांवर पडल्यास डोळे कोरडे पडतात. डोळ्यांत जळजळ होत असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्यानेच ड्रॉप्स वापरावेत.

सकस आहार: डोळ्यांच्या आरोग्यासाठी गाजर, पपई, आंबा आणि हिरव्या पालेभाज्यांचा आहारात समावेश करा.

# समाज जीवनाचे वास्तव देणारे ज्येष्ठ साहित्यिक ए.डी. पाटील. साहित्य रत्न एल.बी.पाटील यांचे प्रतिपादन.



**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** उरण येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन येथे " भावलेली व्यक्तिमत्वे" आणि "सारडे गावचे भवताल " या ए.डी.पाटील यांच्या दोन पुस्तकांच्या प्रकाशना प्रसंगी साहित्यरत्न रायगडभूषण प्रा.एल.बी. पाटील आपल्या ए.डी.सर यांच्या संबंधी बोलताना म्हणाले की, ए.डींनी

३० वर्षांच्या लेखन काळात १८ साहित्यकृती केल्या असून त्या मध्ये शेतकरी,गाव,महिला, समाज जीवन या विषयांवर लेखन केले आहे.त्यामुळे ए.डी. पाटील व एक समाज जीवनाचे वास्तव देणारे साहित्यिक आहेत,असे मत असल्याचे साहित्यरत्न, रायगडभूषण प्रा.एल.बी. पाटील यांनी मांडले.अध्यक्ष प्राचार्य सुरेश पाटील यांचे हस्ते पुस्तक प्रकाशन झाले.पुस्तक परीक्षण स्मिता वाजेकर यांनी केले. प्रास्ताविक करतांना जीवन गावंड यांनी ए.डी.पाटील यांच्या साहित्यसेवा आणि सामाजिक सेवा यावर छान भाष्य केले . कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन रंजना केणी यांनी केले

दहा गाव माजी विद्यार्थी संघ यांनी आपले सहकारी ए.डी.पाटील यांच्या सहयोगाचे साहित्य लेखनाचे कौतुक केले. प्रफुल्ल.वेदक,के एस पाटील, गोपाळ पाटील सुधाकर पाटील,काशिनाथ मढवी, प्रकाश पाटील अनंता गावंड,लवेंद मोकल चंद्रकांत मढवी , मुख्याध्यापिका ए.ए.पाटील इ.आपले विचार मांडले. पी पी पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जल जीवन मिशन योजना कधी पूर्ण होणार, नागरिकांचा सवाल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यात 131 ठिकाणी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत कामे सुरू आहेत. यातील सदतीस कामे पूर्ण झाल्याची माहिती पाणीपुरवठा विभाग पनवेल, पंचायत समिती यांच्याकडून देण्यात आलेली आहे. मात्र अद्यापही जवळपास शंभर कामे अर्धवट स्थितीत असल्याने तालुक्यातील जल जीवन मिशन योजना कधी पूर्ण होणार असा सवाल उपस्थित झाला आहे.गेल्या तीन ते चार वर्षांपासून सुरू असलेल्या जलजीवन मिशन योजनेचे काम सुरुवातीलाच संथ गतीने सुरू होते. त्यातच अपुरा निधी, जागेची कमतरता आणि अन्य कारणांमुळे अनेक कामे रखडली. तसेच काही कंत्राटदारांनी तीन ते चार कामे एकाच वेळेला घेतल्याने त्यांना ती कामे सुरू करता आली नाहीत. त्यामुळे अनेक कामे अर्धवट स्थितीत आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे निधी अभावी अनेक कामे रखडली आहेत. कंत्राटदारांना पैसे मिळालेले नसल्याने कामांचा वेग मंदावला आहे. जवळपास 30 पेक्षा अधिक कामे बंद स्थितीत आहेत. उन्हाळा सुरू झाल्याने सध्या पाणीटंचाई जाणवू लागली आहे.

अद्यापही उन्हाळ्याचे जवळपास तीन महिने बाकी आहेत. गावागावातील जल जीवन मिशन योजना पूर्ण झाल्या असत्या तर नागरिकांना पाणी प्यायला मिळाले असते मात्र जलजीवन मिशन योजना पूर्ण झालेल्या नसल्याने अनेक गावे तहानलेली आहेत.गेल्या तीन ते चार वर्षांपासून सुरू असलेल्या या योजनेचे काम बहुतांशी गावांमध्ये पूर्ण झालेली नाही.

पनवेल तालुक्यातील 37 ठिकाणची कामे पूर्ण झालेली असून आणखी 37 ठिकाणची कामे पूर्णत्वास आलेली आहेत. थोड्याफार प्रमाणात ही कामे अर्धवट आहेत. त्यामुळे या वर्षात तरी जलजीवन मिशन योजना पनवेलमध्ये पूर्ण होऊन नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा व्हायला हवा.

# दिवेआगर समुद्रात तरुणाचा बुडून मृत्यू; मित्रांसोबत फिरायला आलेला पुण्याचा युवक गेला वाहून

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** पुणे येथील 21 वर्षीय तरुणाचा दिवेआगर समुद्रात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सिद्धार्थ रमेश धिंगले (रा. शिवदर्शन चाळ, पुणे) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सिद्धार्थ हा आपल्या मित्रांसोबत दिवेआगर येथे फिरण्यासाठी आला होता. दुपारच्या सुमारास तो समुद्रात पोहण्यासाठी गेला. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने आणि अचानक आलेल्या मोठ्या लाटेमुळे तो समुद्रात वाहून गेला. काही क्षणातच तो मित्रांच्या नजरेआड झाला.

घटनेनंतर मित्रांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, परंतु यश न आल्याने त्यांनी तत्काळ स्थानिक पोलिसांना माहिती दिली. दिघी सागरी पोलिसांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली. पोलिसांसह स्थानिक नागरिकांनीही मोठ्या प्रमाणावर शोधकार्य राबवले.

काही वेळानंतर सिद्धार्थ हा भरडखोल परिसरात बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. त्याला तत्काळ बोर्ली येथील आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले.

मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पर्यटकांनी समुद्रात उतरताना योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# मुंबईतील सफाई कामगारांना मिळणार हक्कांची घरे; उपाध्यक्षांच्या पुढाकारानंतर मुख्यमंत्र्यांचे ठोस आश्वासन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी/अरविंद बनसोडे कुरनूरकर :** मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांसाठी मोठा दिलासा देणारी घडामोड घडली असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना अंतर्गत त्यांना हक्काची घरे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या पुढाकाराने म्युन्सिपल मजदूर युनियनच्या शिष्टमंडळाने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.



या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने शासन निर्णय २००८ व २०१५ ची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेत, मुंबई महापालिकेने नव्याने उभारलेल्या घरांपैकी ५० टक्के घरे सफाई कामगारांना मालकी हक्काने देण्याचे ठोस आश्वासन दिले. तसेच या योजनेची अंमलबजावणी येत्या अधिवेशनात जाहीर करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, या मागणीसाठी म्युन्सिपल मजदूर युनियन, मुंबईच्या वतीने २३ मार्च रोजी आझाद मैदान येथे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. मात्र आंदोलनापूर्वीच उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी मध्यस्थी करत मुख्यमंत्री यांची भेट घडवून आणली आणि तोडगा काढण्यात यश मिळवले.मुंबई महापालिका क्षेत्रातील एकूण ३६ वसाहतींचे पुनर्वसन करण्यात आले असून सुमारे १२,२०० नवीन घरे उभारण्यात आली आहेत. यापैकी ५० टक्के घरे सफाई कामगारांना देण्याचा निर्णय घेतल्याने हजारो कुटुंबांना स्थिर निवासाची संधी उपलब्ध होणार आहे.

या बैठकीस विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, म्युन्सिपल मजदूर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव, वामन कविस्कर, हिंदुराव जाधव आदी उपस्थित होते.

# पोलीस स्टेशन गोंदिया ग्रामीण अंतर्गत मौजा नागरा येथे अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या ७ इसमाविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

## जुगार खेळणाऱ्या आरोपीकडून ५ अँड्रॉइड मोबाईल व रोख रक्कम असा एकूण ८१,४५०/- रुपयाचा माल जप्त.

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** पोलीस अधीक्षक गोंदिया मा. श्री गोरख भामरे, निर्देश सूचनाप्रमाणे जिल्ह्यात अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या विरुद्ध धाड कारवाई करण्यासाठी निर्देश दिलेले आहेत.दिनांक १९/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा गोंदिया येथील पथक अवैधधंदा रेड तसेच गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करीत असता खात्रीशिर माहिती प्राप्त झाली कि मौजा नागरा शेत शिवार परिसरात काही इसम ५२ तासपत्तीवर पैश्याची बाजी लावून हारजीतचा जुगार खेळ खेळवीत आहेत. मिळालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पुरुषोत्तम अहेरकर यांचे मार्गदर्शनात मौजा नागरा शेत शिवार परिसरात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने



धाड घातली असता सदर ठिकाणी इसम नामे १) हरीश तांडेकर वय ३३ वर्ष राहणार झोपडी मोहल्ला गोंदिया २) राजेश लिल्हारे वय ६७ राहणार नागरा ३) आकाश वाढावे वय ३२ वर्ष राहणार रामनगर गोंदिया ४) छन्नु बीरिया वय ५३ वर्ष राहणार सावरटोली गोंदिया ५) रिंकल राजपाल वय ३६ वर्ष राहणार सिविल लाईन गोंदिया हे ५ इसम ५२ तासपत्तीवर पैश्याची बाजी लावून हारजीतचा जुगार खेळ खेळतांना मिळून आले. सदर ५ हि इसमांना पंचासमक्ष झडती घेण्यात आली असता त्यांचे ताब्यातून रोख रक्कम रु. ४२०५०/- , ५ अँड्रॉइड मोबाइलव जुगार खेळण्याचे साहित्य अशा एकूण ८२,४५०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीना विचारपूस केली असता सदरचा जुगार हे पिरथलाल उर्फ मुन्ना पतेहे राहणार नागरा व अल्ताफ राहीन राहणार रामनगर गोंदिया हे खेळवीत असल्याचे सांगितले. करिता आरोपी १) १) हरीश तांडेकर वय ३३ वर्ष राहणार झोपडी मोहल्ला गोंदिया २) राजेश लिल्हारे वय ६७ राहणार नागरा ३) आकाश वाढावे वय ३२ वर्ष राहणार रामनगर गोंदिया ४) छन्नु बीरिया वय ५३ वर्ष राहणार सावरटोली गोंदिया ५) रिंकल राजपाल वय ३६ वर्ष राहणार सिविल लाईन गोंदिया ६) पिरथलाल उर्फ मुन्ना पतेहे राहणार नागरा व ७) अल्ताफ राहीन राहणार रामनगर गोंदिया यांचे विरोधात पोलीस ठाणे गोंदिया ग्रामीण येथे पोहवा संजय चव्हाण नेमणूक स्थागुशा गोंदिया यांचे तक्रारी वरून १६३/२०२६ कलम १२(अ ) महाराष्ट्र (मुंबई) जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठांचे निर्देश सूचना प्रमाणे पोलीस ठाणे गोंदिया ग्रामीण पोलीस करीत आहेत..सदरची दर्जेदार धाड कारवाई पोलीस अधीक्षक गोंदिया मा. श्री. गोरख भामरे यांचे निर्देश सूचना प्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पुरुषोत्तम अहेरकर यांचे मार्गदर्शनात पोलीस अंमलदार संजय चौहान, सुबोध बिसेन, प्रकाश गायधने, दीक्षितकुमार दमाहे , इंद्रजित बिसेन, दुर्गेश तिवारी, भोजराज बहेकार, संतोष केदार, दुर्गेश पाटील, व राम खंदारे यांनी कारवाई केलेली आहे..

# खारघरमध्ये मध्यरात्री टॉवर उभारणी ; नागरिकांचा संताप, पोलीस आणि पालिका अधिकाऱ्यांकडे तक्रार

**दैनिक युवक आधार**
**खारघर प्रतिनिधी :** परिसरातील रस्त्याच्या मधील डिव्हायडरवर मोबाईल/इंटरनेट टॉवर उभारण्यास नागरिकांचा तीव्र विरोध असतानाही संबंधित कॉन्ट्रॅक्टरने मध्यरात्री नागरिक झोपेत असताना रातोरात टॉवर उभारल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, यापूर्वीच या ठिकाणी खोदकाम करून सिमेंटचा मजबूत बेस तयार करण्यात आला होता . त्या वेळी स्थानिक नागरिकांनी आक्षेप नोंदवला होता. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करत गुपचूप पद्धतीने टॉवर उभारण्यात आल्याने परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर टॉवर उभारणीसाठी आवश्यक परवानग्या घेतल्या आहेत का, याबाबत अद्याप स्पष्टता नसून, सार्वजनिक जागेवर—विशेषतः रस्त्याच्या डिव्हायडरवर— अशा प्रकारची उभारणी करण्यात आल्याने सुरक्षेचा व वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाला आहे. या घटनेविरोधात स्थानिक नागरिकांनी एकत्र येत Kharghar Police Station येथे तक्रार नोंदवली आहे. तसेच या प्रकरणी पनवेल



महानगरपालिकाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडेही लेखी तक्रार देण्यात आली आहे. दरम्यान, पालिका प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून टॉवर उभारणी वैध आहे का याची खात्री करावी, तसेच अनधिकृत असल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. या घटनेमुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांच्या विरोधाला न जुमानता करण्यात आलेल्या या उभारणीवर पुढे काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ३३ ओबीसी जातींच्या केंद्रीय आरक्षणासाठी खारघरमध्ये एल्गार

## कराडी समाजाचा सक्रिय सहभाग आणि पदभार सोहळा संपन्न!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील ३३ ओबीसी जाती समूहांचा केंद्रीय ओबीसी यादीत समावेश व्हावा, या प्रमुख मागणीसाठी 'महाराष्ट्र ओबीसी कृती समिती'ची राज्यव्यापी बैठक रविवार, २२ मार्च रोजी खारघर येथे उत्साहात पार पडली. विशेष म्हणजे, लेवा गुजर आणि कराडी समाजाच्या वतीने या बैठकीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कराडी समाजाच्या अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून या लढ्याला बळ दिले, ज्यामुळे समाज बांधवांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या बैठकीत विविध नव्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळाही पार पडला. अध्यक्ष श्रावण फरकाडे यांनी मार्गदर्शन करताना स्पष्ट केले की, आरक्षण हा समाजाचा हक्क असून तो मिळवण्यासाठी कोणत्याही स्तरावर संघर्ष करण्याची आमची तयारी आहे. केंद्रात आरक्षण नसल्यामुळे अनेक ओबीसी जातींना, विशेषतः ग्रामीण भागातील तरुण पिढीला नोकरी व शिक्षणात मोठ्या अडचणी येत आहेत. न्याय न मिळाल्यास लवकरच दिल्लीत तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

या ऐतिहासिक बैठकीत कराडी समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरक्षणाच्या या लढ्यात कराडी समाज खांद्याला खांदा लावून उभा असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले. आपल्या हक्काच्या आरक्षणासाठी समाजाची ही एकजूट पाहून उपस्थित बांधवांनी समाधान व्यक्त केले आहे.

कार्याध्यक्ष राम खरपुरीया यांनी सांगितले की, सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे केंद्र सरकारने या प्रश्नाची दखल घेतली असून हा मुद्दा आता अंतिम टप्प्यात आहे. लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला संरक्षक मंडळातील नामदेव राऊत व पी आर बडगुजर यांनी आरक्षणासाठी आतापर्यंत झालेल्या प्रयत्नांची माहिती दिली तर सरिता गाकरे यांनी एकजुटी चे महत्व अधोरेखित केले



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिदास चौधरी यांनी केले या बैठकीत केंद्राच्या मागासवर्गीय आयोगाचे माजी अध्यक्ष व विद्यमान अध्यक्षांच्या आभार मानण्यात आले. कराडी समाजाच्या सक्रिय सहभागामुळे या आंदोलनाला नवी दिशा मिळाली असून शासन दरबारी समाजाचा आवाज अधिक प्रभावीपणे पोहोचेल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कराडी समाजाच्या वतीने दाखवण्यात आलेले हे संघटन पाहून उपस्थित बांधवांमध्ये समाधानाचे आणि अभिमानाचे वातावरण होते. आपल्या पूर्वजांचा वारसा आणि भविष्यातील पिढीचे कल्याण डोळ्यासमोर ठेवून कराडी समाजाने या लढ्यात दिलेले योगदान फार महत्त्वाचे आहे. आमचा हक्क आमचा लढा हा मंत्र जपत कराडी समाज बांधवांनी या बैठकीतून आरक्षणाची ही मशाल घराघरात पोहोचवण्याचा संकल्प केला आहे. या एकजुटीमुळे आता दिल्लीचे तक्तही आमच्या हक्काची दखल घेईल असा विश्वास प्रत्येक कराडी समाजाच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत आहे.

## डॉ. बबनराव नागरगोजे यांना राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार जाहीर



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार साठी निवड झालेल्या व्यक्ती व संस्थांची नावे जाहीर करण्यात आली असून, रायगड जिल्ह्यातील खोपोली येथील डॉ. बबनराव नागरगोजे यांची या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड झाली आहे. व्यसनमुक्ती क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन लेखक गटातून त्यांना हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. डॉ. नागरगोजे यांनी वैद्यकीय क्षेत्रासोबतच सामाजिक बांधिलकी जपत व्यसनमुक्ती जनजागृतीसाठी सातत्याने कार्य केले असून त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.दि. २६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार असून या सोहळयास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच या कार्यक्रमाच्या अनुषंगाने दि. २५ मार्च रोजी सकाळी ९ वाजता व्यसनमुक्ती जनजागृती दिंडीची सुरुवात गेटवे ऑफ इंडिया येथून होऊन सांगता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे होणार आहे. त्यानंतर दुपारी व्यसनमुक्ती विषयक चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बबनराव नागरगोजे हे भाजप वैद्यकीय सेल कोकण विभागाचे संयोजक असून रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष म्हणूनही उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांना यापूर्वी रायगड भूषण, आरोग्यम धनसंपदा तसेच इतर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. वैद्यकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. बबनराव नागरगोजे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या या यशामुळे रायगड जिल्ह्याचा मान उंचावला असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

## कपडे धुण्यासाठी गेलेली १८ वर्षीय तरुणी मृतावस्थेत सापडली; पालखेड डाव्या कालव्यात पाण्यावर तरंगताना आढळली

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी : नैताळे** – बोकडदरे शिवारात कपडे पालखेड डावा कालवा परिसरात कपडे धुण्यासाठी गेलेल्या १८ वर्षीय तरुणीची दुखद मृत्यूची घटना उघडकीस आली आहे. मृत तरुणी ज्योती अनिल शेकरे (वय १८ वर्षे) ही ओबीधोंड, ता. पेठ येथील रहिवासी होती.




माहिती अशी आहे की २१ मार्च रोजी दुपारी सुमारे ४:३० ते ५ वाजण्याच्या दरम्यान ज्योती कपडे धुण्यासाठी कालव्याच्या किनाऱ्यावर गेली होती. या दरम्यान पाय घसरल्यामुळे ती थेट पाण्याच्या प्रवाहात पडली. घडलेल्या अपघातानंतर कुटुंबीय व स्थानिकांनी तिच्या शोधासाठी शोधमोहीम सुरू केली, मात्र २ दिवसांच्या अथक प्रयत्नांनंतर २३ मार्च रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास तिचा मृतदेह डोंगरगाव परिसरातील पालखेड डाव्या कालव्यात पाण्यावर तरंगताना आढळला.

या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सागर घोलप व योगेश आव्हाड करत आहेत. तसेच, आपत्ती व्यवस्थापन शोध पथकातील मंगेश केदारे, संकेत नेवकार, राजेश गवळी, सुनिल सदाराव, नानाजी सोनवणे, सागर गडाख, किरण वाघ, वैभव जमदाडे व फकिरा धुळे यांनी शोधकार्य राबवले. मंडळ अधिकारी संतोष डुमरे व तलाठी शुभम पाटसकर हेही घटनास्थळी उपस्थित होते.

मृतदेहाचा पंचनामा करून पुढील शवविच्छेदनासाठी निफाड ग्रामीण रुग्णालय येथे पाठवण्यात आले. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरातील लोकांमध्ये हळहळ व्यक्त होत असून, ज्योतीच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

स्थानीय रहिवासी आणि शेजारी या घटनेवर दुःख व्यक्त करत आहेत. प्रशासन आणि पोलीस पुढील तपास करत आहेत, आणि या घटनास्थळी सुरक्षा उपाय योजले जात आहेत, जेणेकरून भविष्यात अशा अपघातांची पुनरावृत्ती होऊ नये.

## प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेची खोरोची शाखेचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय :** प्रहार दिव्यांग क्रांती संघटना इंदापूर तालुका व शहर यांच्या वतीने खोरोची येथे शाखेचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमास पुणे जिल्हाध्यक्ष शरद जाधव, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष इंगोले, जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष दिवेकर अण्णा, इंदापूर तालुका अध्यक्ष अनंतराव गायकवाड,तालुका महिला अध्यक्ष सूक्षला ढाणे, तालुका सचिव रामदास चव्हाण,तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब जामदार,तालुका महिला उपाध्यक्ष रूपालीताई जगताप,तालुका खजिनदार भारत शेंडे, तालुका सहखजिनदार युनुस शेख, तालुका संपर्कप्रमुख महेश्वर जगताप,दौंड तालुका संघटक दादा ढमे उपस्थित होते.

खोरोची शाखेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये अध्यक्षपदी मनीषाताई नगरे, उपाध्यक्षपदी उर्मिलाताई पाटील,सचिवपदी राजन नगरे,सहसचिवपदी ताई मदने,खजिनदारपदी राजेंद्र चव्हाण,सहखजिनदार पदी अरविंद कदम यांची निवड करण्यात आली सदस्य म्हणून रियाज मुलानी,सचिन हेगडकर,माया कुंभार,राजेंद्र किसवे,सागर कदम,सुरज जाधव लखन जाधव, सोमनाथ मोरे,प्रणिता देवकर, विघ्नेश हेगडकर यांचा समावेश आहे.सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांचा सहभाग या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते संजय भाऊ चव्हाण,माजी सरपंच राजू भाळे,राहुल कांबळे, सतीश काका हेगडकर, ग्रामपंचायत सदस्य विशाल देवकर,सौ. अर्चना गोरड, महिला बचत गटातील आस्मा मुलानी,अरुणा साठे,शोभा भोसले,सुरेखा नगरे,गौरी भोसले तसेच आरोग्यसेविका मोहिनी मिसाळ उपस्थित होत्या.या शाखेच्या स्थापनेमुळे दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांना अधिक बळ मिळणार असून संघटनेचे कार्य गावागावात पोहोचेल,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.उपस्थित मान्यवरांनी नव्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत संघटनेच्या कार्याला पाठबळ देण्याचे अहवान केले.

# गोष्ट ‘सरव्याची’ माणुसकीच्या दाण्यांची

फाल्गुन संपत आला होता… शेतातल्या ज्वारी-गव्हाच्या कणसांचा सुगंध अजूनही हवेत दरवळत होता. खळे उरकले होते, आणि आता नांगरटी सुरू झाल्या होत्या. आमच्याही शेतात कामांची लगबग होती. मी दहावीत होतो—परीक्षा संपली आणि आता सकाळी नांगरणाऱ्या माणसांसाठी न्याहारी घेऊन जाण्याची जबाबदारी माझ्यावर आली होती.यंदा आमची सावड आनंद मामा आणि आसाराम अण्णा यांच्या सोबत होती.

आनंद मामा आणि आसाराम अण्णा—दोघेही कडक स्वभावाचे. त्यांच्यासोबत सावड करायला कोणी फारसं धजावत नसे. पण आमचे तात्या… वयाने मोठे आणि नात्याने जवळचे, त्यामुळे त्यांच्या बोलण्याला ते दोघेही मान देत.

गेली ५–६ वर्षे दुष्काळाने गावाला पोखरलं होतं. तरीही, देवाच्या कृपेने आमच्या घरात वर्षभर पुरेल इतकं धान्य होतं.



त्या सकाळी आसाराम अण्णा घरी आले.

“दाजी, आनंदाचं झालं की तुमचं नांगरून घेऊ,” ते म्हणाले.

तात्या शांतपणे म्हणाले, “अजून माझा सरवा वेचून झाला नाही, दोन-तीन दिवस लागतील.”

हे ऐकताच अण्णा चिडले—

“तीन-तीन पोरं असूनही अजून सरवा नाही झाला!”

आणि ते रागात निघून गेले…

त्यांच्या जाण्यानंतर माझ्या मनात प्रश्नांची गर्दी झाली.

“तात्या, तुम्हीच तर म्हणाला होतात—सरवा नंतर वेचू…”

तात्यांनी काही उत्तर दिलं नाही… पण त्यांच्या शांततेत एक मोठं सत्य दडलं होतं.

आमच्या शेतातला ‘सरवा’ आम्ही कधीच वेचत नव्हतो. तो महारवाड्यात ल्या नामा ची बायको वेचायची त्याची परिस्थिती आमच्याहूनही हालाकीची. स्वतःची जमीन नाही, मजुरीवर संसार… दोन मुली, एक मुलगा… आणि गावकुसाबाहेरचं कुडाचं घर.

दुष्काळामुळे कामं कमी झाली होती, नामा आणि त्याची बायको लोकांच्या शेतात सरवा वेचून धान्य जमा करायचे. पण सगळेच त्यांना शेतात येऊ देत नसत. काहींनी दिलं, तरी अर्धं धान्य परत घ्यायचे…

पण आमचे आई-तात्या वेगळे होते.

ते नेहमी म्हणायचे—

“देवाने आपल्याला पोटापुरतं दिलं आहे… मग खाली पडलेल्या ओंब्या त्यांनी वेचल्या तर काय बिघडलं?”

भर उन्हात… अनवाणी पायांनी… नामा, त्याची बायको आणि लेकरं दिवसभर त्या दाण्यांसाठी झटायची. ते दृश्य पाहिलं की मन आतून तुटून जायचं…

यंदा मात्र नामा आजारी पडला होता. ज्वारीची कडबा बांधताना त्याला उष्माघात झाला… आणि त्यामुळे आमचा सरवा तसाच राहिला.

तात्यांनी मुद्दाम तो वेचला नव्हता… कारण त्यांना ठाऊक होतं—

हा सरवा फक्त धान्य नाही…

तो एखाद्या घराचा आधार आहे…

एखाद्या आईच्या चुलीचा उजेड आहे…एखाद्या लेकराच्या पोटातील भूक शांत करणारा दाणा आहे…

त्या दिवशी मला कळलं—

शेतीत उगवणारे दाणे फक्त पिक नसतात…

ते माणुसकीचं पीक असतं…

आणि ‘सरवा’ म्हणजे…

शेतात उरलेलं धान्य नव्हे…

तर मनात उरलेली माणुसकी आहे.

**लेखक : अजय पांडुरंग कापरे**

## पोलीस अधीक्षक कार्यालय गोंदिया येथे शहीद दिवस साजरा



**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड /गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णयान्वये सन २०२६ मध्ये राष्ट्र पुरुष/थोर व्यक्ति संत व समाजसुधारक यांची जयंती शासकिय कार्यालयात साजरी करण्यात यावी असे निर्देश आहे. त्याअनुषंगाने दिनांक २३ मार्च २०२६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय गोंदिया येथे मा. श्री. गोरख भामरे, पोलीस अधीक्षक गोंदिया यांच्या शुभ हस्ते सरदार भगतसिंह, शिवराम हरि राजगुरु व सुखदेव थापर यांचे शहीद दिना निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.सदर कार्यक्रमात मा. पोलीस अधीक्षक गोंदिया यांच्यासह श्री रामदास शेवते प्रभारी पोलीस उप-अधीक्षक (मुख्या.) गोंदिया मपोनि नंदिनी चानपुरकर तसेच गोंदिया पोलीस विभागातील पोलीस अधिकारी/अंमलदार व मंत्रालयीन स्टाफ हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामस्थ मंडळ कुंडेगाव कोळीवाडा आयोजित संत तुकोबाराय गाथा( बाळक्रीडा )संगीत पारायण सोहळा मोठ्या भक्ती भावात संपन्न !!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर** : उरण तालुक्यातील कुंडेगावात ह.भ.प.दिपक महाराज भोईर व ह.भ.प.रेवती दिपक भोईर तसेच ह.भ.प.कुमार विश्राम दिपक भोईर,श्री.करूण प्रकाश पाटील,श्री. अजय प्रकाश पाटील तसेच सौ.सविता नितिन मढवी सरपंच नवघर ग्रामपंचायत नवघर यांच्या विद्यमानाने गुरूवा दिनांक १९/०३/२०२६ ते शनिवार दिनांक २१/०३/२०२६ रोजी पर्यंत संत तुकोबाराय गाथा(बाळक्रीडा) संगीत पारायण सोहळा सपन्न झाला असून कळश पुजन,श्री गणेश मुर्ती पुजन,श्री हनुमान मुर्ती पुजन,विणा पुजन,दिप प्रज्वलन,संत तुकोबाराय मुर्ती पुजन,संत तुकाराम गाथा ग्रंथ पुजन हे ग्रामस्थ मंडळ कुंडेगाव यांच्या हस्ते होऊन काकड आरती पहाटे ४ ते ७ वाजता गुरूवर्य ह.भ.प.गजानन महाराज ठाकूर(बेलपाडा) यांच्या मार्गदर्शनाखाली बेलपाडा ह.भ.प.धर्मा हरि कोळी,ह.भ.प.वत्सला गजानन ठाकूर,गिता गोवर्धन कडू,ह.भ.प.आनंदी कोळी गव्हाण,ह.भ.प.जनार्दन महाराज सुकापुर,ह.भ.प.नारायण महाराज धाकटी जुई,श्री.मनिलाल चंदर भोईर मोठी जुई ह.भ.प.बेबीबाई यादव कोळी दिघोडे,कुमारी दुष्टी निळकंठ मढवी,कुमारी कार्तीकी हेमंत भोईर,कु.हिमश्री गीतेश पाटील हनुमान कोळीवाडा व ग्रामस्थ मंडळ कुंडेगाव व श्री गणेश हरिपाठ मंडळ कुंडेगावसह संत तुकोबाराय गाथा बाळ क्रिडा पारायण व्यासपीठ चालक ह.भ.प.बाळकृष्ण महाराज भगत(गव्हाण),ह.भ.प.मनोज महाराज ठाकूर ह.भ.प.नरेंद्र महाराज कडू(बेलपाडा) तसेच संत तुकोबाराय बाळ क्रिडा संगित गाथा पारायण सकाळी ०९ ते १२ वाजता आणि भजन सेवा दुपारी १ ते ३ ,प्रवचन सेवा सांय ४-३० ते ५-३० हरिपाठ तर सायंकाळी ६ -०० सामुदायिक हरिपाठ,किर्तन सेवा ८ ते १० तर जागर भजन रात्री १० नंतर असे भरगच्च



पारायण सोहळ्याचे आयोजन करून चैत्र शु.२ शुक्रवारी दुपारी कुंडेगाव नगरीमध्ये पायी दिंडी नगर प्रदक्षिणा व संत ज्ञानोबा,तुकोबाराय पालखी सोहळा संपन्न होऊन चैत्र शु.३ शनिवार दि.२१/०३/२०२६ रोजी ठिक १० ते १ वाजता ह.भ.प.मनोज महाराज ठाकूर(बेलपाडा) यांचे काल्याचे किर्तन सौजन्य स्व.भगवान सोमा पाटील यांच्या स्मरणार्थ प्रशात भगवान पाटील(उरण कोट) यांच्या वतीने संपन्न झाले असता गायनाचार्य ह.भ.प.राजेद्र महाराज पाटील(गुरूजी),ह.भ.प.भास्कर महाराज कोळी (गव्हाण) ह.भ.प.मनोहर महाराज पाटील (नवघर),ह.भ.प.राहूल महाराज बंडा(नवघरपाडा) ह.भ.प.रोशन महाराज ठाकूर,कु. सात्विक प्रसाद कडू,कु.हरश्री मनोज ठाकूर(बेलपाडा),ह.भ.प.करूणा गणेश कडू(कुंडेवाहळ) तसेच किर्तन साथकरी पंचक्रोशीतील सर्व आदरनिर्य वारकरी,गुणीजन,गायक,वादक,टाल करी,श्रोतेजन आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थीत राहून टाल मृदुंगाच्या गजरात तिन्ही दिवस कुंडेगावासह संपुर्ण परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघालेले पाहवयास मिळाले असता काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाचा आनंद सर्व भाविकांनी घेऊन पारायणाची सांगता करण्यात आली.